परस्परं भावयन्तः
म प्र

मराठे प्रतिष्ठान, मुंबई यांचे मुखपत्र

# हितगुज

अंक १२६ ✿ संपादिका : डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे (पृष्ठ १२०) ✿ जून २०२१

Website : www.marathepratishthan.org

(फक्त खाजगी वितरणासाठी)

## संपादकीय

*प्रिय कुलबांधवांना आणि भगिनींना*

*माझा सस्नेह नमस्कार.*

'मराठे प्रतिष्ठान'चा 'हितगुज' जूनचा अंक गेल्यावर्षी १ जून २०२०ला प्रथमच 'डिजिटल' स्वरूपात निघाला. करोनाच्या संकटामुळे आपण हितगुज छापील स्वरूपात न देता आता डिजिटल स्वरूपातच देत आहोत.

आज कोरोनाच्या जागतिक महामारीमुळे सारे जग हादरले आहे. परंतु या महामारीमुळे आपण हतबल न होता सकारात्मक दृष्टिकोन ठेवून ही लढाई जिंकायची आहे. परिस्थिती दुःखाची असली तरी या संकटकाळात खंबीर राहून सर्वांनी आरोग्याची काळजी घेऊन, एकत्र राहून या महामारीतून मार्ग काढायचा आहे. कोरोनासंबंधी सर्व नियमांचे आपण काटेकोरपणे पालन करतोच आहोत. शांत राहून, ईश्वरचिंतन करण्यासाठी, स्वतःचा शोध घेण्यासाठी या वेळेचा सदुपयोग करून घेता आला पाहिजे. कोरोनामुळे अनेक जणांना प्राण गमवावे लागले आहेत.

प्रिय, कुटुंबातील व्यक्तींना कोरोनाने हिरावून नेले आहे. त्या कुटुंबावर दुःखाचा किती मोठा डोंगर कोसळला असेल. निष्पाप बालके आई-वडील गेल्याने अनाथ झाली आहेत. ऑक्सिजन न मिळाल्यामुळे गुदमरून किती दुर्दैवी जीवांना जग सोडून जावे लागले, मृत्यूचे भीषण तांडव या महामारीने मांडले आहे. खरं तर निसर्ग जीवनामध्ये मृत्यूचे स्थान किती सुंदर, आनंदमय आणि मंगल आहे याचे यथार्थ वर्णन उपनिषदातील अतिशय प्रभावी महामृत्युंजय मंत्रामध्ये केले आहे. तो मंत्र असा.

**ॐ त्र्यंबकं यजामहे सुगन्धिं पुष्टिवर्धनम् ।**
**उर्वारुकमिव बन्धनान्मृत्योर्मुक्षीय माऽमृतात् ।।**

मृत्यूचा अधिपती, लयकर्ता, त्रिनेत्रधारी महादेव शंकर यांच्या चरणी मी प्रार्थना करते की त्यांनी मला अकाली मृत्यूपासून (कोरोनासारख्या महामारीपासून) दूर ठेवावे. माझ्या शरीराची सौष्ठवपूर्ण, निरोगी उत्तम वाढ होऊ द्यावी व त्यानंतरच माझ्या कृतकृत्य जीवनाचा शांतपणे ईश्वरीय तत्त्वात लय होऊ द्यावा, म्हणजेच मला अमृतत्त्व मिळावे. भोपळा जसा परिपूर्ण अवस्था प्राप्त झाल्यानंतर देठापासून सुकतो आणि अगदी अलगद वेलीपासून सहज विलग होतो, तशा परिपक्व अवस्थेत माझा शांतपणे मृत्यू होवो.

ईश्वराकडे, कुलदेवतेकडे हीच प्रार्थना मराठे परिवारासाठी करु या.

आपली शुभचिंतक

**डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे,** (पृ. १२०),

(दि. २६ मे २०२१, बुद्धपौर्णिमा)

भ्रमणध्वनी : ९८२०२३२०८२

संपादिका : डॉ. सौ. सुमेधा प्र. मराठे, ८/१३, सहकार नगर, वडाळा, मुंबई - ४०००३१
दूरध्वनी : ०२२-२४१५०८८९ • इ-मेल : parbhakar.marathe@gmail.com
मुद्रक : इंडिया प्रिंटिंग वर्क्स, वडाळा, मुंबई - ४०००३१

# एक स्तुत्य उपक्रम



फळांचा राजा असं ज्याला संबोधलं जातं ते फळ म्हणजे आंबा. प्रत्येकाला आवडतो. एप्रिल ते जून या काळातच आंबा मिळतो. भारत व पाकिस्तान या देशात राष्ट्रीय फळ म्हणून आंब्याला मान्यता मिळाली आहे. बांगलादेशचे राष्ट्रीय झाड म्हणून आम्रवृक्षास मान्यता आहे तर फिलिपिन्समध्ये राष्ट्रचिन्ह म्हणून आंब्यास मान्यता आहे. भारतात आंब्याच्या १३०० जाती आहेत पण कोकणातील हापूस आंबा सर्वश्रेष्ठ म्हणून आब राखून आहे.

आपल्या परिवारातील मराठ्यांच्या सुकन्या हे आंबे स्वतः तर अत्यंत आवडीने खातात पण गेली ९ वर्षे पुण्याजवळील सिंहगड पायथ्याजवळील डोणजे गावातील ‘आपलं घर’ या मुलांच्या व वृद्धांच्या आश्रमास हापूस आंबे देतात व त्यांनाही आपल्या आनंदात सामील करून घेतात. श्री. विजय फळणीकर यांनी २००१ साली ‘आपलं घर’ या संस्थेचे कार्य सुरू केले. अनाथ मुले व वृद्ध यांचा सांभाळ करणे, येथील मुलांच्या कलागुणांना प्रोत्साहित करणे असे कार्य येथे केले जाते. जवळपासच्या खेडी, वाड्या वस्त्या यांच्यासाठी एक फिरता दवाखाना पण या संस्थेने सुरू केला आहे.

या वर्षीही कस्तुरीने आपल्या बहिणी तेजस्विनी मराठे – ओक, अश्विनी मराठे – करंदीकर, अंजली मराठे – कुलकर्णी व मैत्रीण धनश्री मराठे ह्यांना online एकत्र केले व ठरवले अक्षयतृतीयेच्या पूर्वसंध्येला आपण हापूस आंबे ‘आपलं घर’ या संस्थेतील मुलं व वृद्धांसाठी द्यायचे. सर्वानाच ही कल्पना आवडली इतकंच नाही, तर हापूस आंब्यांच्या खरेदीसाठी पैसेही पाठवले. कस्तुरी आणि धनश्रीने चांगल्या आंब्यांची निवड केली व ३२ डझन आंबे ‘आपलं घर’ संस्थेतील मुलं व वृद्धांसाठी १३ एप्रिल या दिवशी संध्याकाळी भेट म्हणून दिले.

सातत्याने हा उपक्रम चालवल्याबद्दल सर्वांचे अभिनंदन. ♦

---

## सुगरणीचा सल्ला

- आंब्याचा रस किंवा श्रीखंड आंबट असल्यास त्यात थोडा खाण्याचा सोडा दुधात विरघळून घालावा. सर्व आंबटपणा निघून जातो. आंबट पदार्थात खूप साखर घातल्यास चव वेगळी लागते.





- मेंदूवडे करताना वड्याचे पीठ पातळ झाल्यास त्यात बारीक रवा मिसळावा. वडे कुरकुरीत होतात.

## आरोग्यं धन संपदा

- जर तुम्ही कॉम्प्युटरवर काम करीत असाल तर अर्ध्या अर्ध्या तासानंतर काही मिनिटे डोळे बंद करून त्यांना आराम द्यावा
- शरीराचा स्थूलपणा कमी करण्यासाठी व्यायाम हे उत्तम औषध आहे. नियमित व्यायाम केल्याचा फायदा म्हणजे कच्चे–पक्के कोणतेही भोजन शरीरात दोष न वाढवता पचते.

## सुविचार

कोणी कौतुक करो वा टीका लाभ आपलाच,
कौतुक प्रेरणा देते, तर टीका सुधारण्याची संधी.

गोविंद, गोविंद । मना लागलिया छंद
मग गोविंद ते काया । भेद नाही देवा तया ।।

# संवाद कुलबांधवांशी

•श्री. हेमंत अरुण मराठे (पृ. २१), नालासोपारा भ्रमणध्वनी : ९८२२८४७१२०/९२२०६९९९५७

**नमस्कार मंडळी,**

जून २०२१ ह्या अंकाद्वारे आपणाशी संवाद साधताना मला अतिशय आनंद होत आहे. मागच्या वर्षी कोरोना सुरू झाल्यामुळे जून २०२०चा 'हितगुज' अंक कसा निघणार या विवंचनेत असताना हा अंक डिजिटल स्वरूपात काढावा असा निर्णय घेतला व सर्वजण आपापल्या घरी असतानाही तो अंक व त्यानंतरचे सगळे अंक वेळेत तयार करून 'मराठे प्रतिष्ठान'च्या वेबसाइटवर अपलोड केले गेले. याबद्दल सर्व लेखक तसेच डिटीपी करणारे श्री. अंकुश व त्यानंतर वेबसाइटवर अपलोड करणारे श्री. श्रीनिवास मराठे ह्यांचे कौतुक करावे तेवढे कमीच.

सुरुवातीला काहीजणांना अंक उघडणे कठीण गेले मात्र योग्य मार्गदर्शन व सरावाने आता बरेच कुलबांधव व भगिनी अतिशय सराईतपणे आपला 'ई' अंक वाचत आहेत. बरेचजणांनी या 'ई' अंकाचे कौतुकही केले आहे व आता असाच अंक नियमित काढावा जेणेकरून आपला वेळ व श्रम वाचतील तसेच संस्थेच्या पैशांची बचत होईल व याचबरोबर अंक ताबडतोब पाहिजे तेव्हा वाचता येईल असे सांगितले.

या आपल्या आश्वासक प्रतिक्रियांमुळे ह्या अंकाला आपला प्रतिसाद वृद्धिंगत होईल हीच आशा.

मंडळी गेल्या वर्षभर आपण अभूतपूर्व संकटाला तोंड देत असूनही टिकून आहोत व विविध प्रकारे आपण याला तोंड देत आहोत. प्रत्येक गोष्टीसाठी पर्याय शोधून पुढे जात आहोत. याचमुळे आपण सर्वजण या संकटावर मात करून पुढे जाऊ हा विश्वास मला आहे.

या वर्षभरात काहीजणांना आर्थिक संकटाला तोंड द्यावे लागते आहे. बरेचजण त्यातूनही पर्याय शोधत आहेत. मात्र काहीजणांना मदतीची आवश्यकता असू शकते. तेव्हा आम्ही आपणास असे आवाहन करत आहोत की, ज्यांना शक्य असेल त्यांनी 'प्रतिष्ठान'ला यथाशक्ती देणगी द्यावी व त्यातून आपण ज्या कुलबांधवांना मदतीची गरज असेल त्यांना आवश्यक ती मदत देऊ. गेल्या काही वर्षांत 'प्रतिष्ठान'कडे येणारा देणगीचा ओघ कमी झाल्याने आपण अपेक्षित मदत देऊ शकत नाही तरी या आवाहनाला प्रतिसाद म्हणून शक्य त्यांनी यथाशक्ती देणगी पाठवावी. देणगी पाठवल्यानंतर आम्हाला कळवणे आवश्यक आहे व त्यामध्ये आपला पत्ता, भ्रमणध्वनी, ई–मेल व पॅनकार्डची प्रत तसेच देणगी कोणत्या कारणासाठी याचा उल्लेख अवश्य करावा ही नम्र विनंती.

आता लिखाणासाठी आवाहन.

आपल्या कुटुंबातील सदस्य विविध क्षेत्रात कार्यरत आहेत तेव्हा तुमच्या क्षेत्रातील महत्त्वाच्या गोष्टींबद्दल आपण लिखाण करावे व आपल्या 'हितगुज'मध्ये प्रसिद्धीसाठी पाठवावे. नेहमी कथा, कविता, प्रवासवर्णन असे लिखाण असतेच. मात्र काही लेख वेगवेगळ्या विषयांवर जर दिले तर लोकांच्या माहितीमध्ये भर पडेल व अंक आणखी वाचनीय होईल असे वाटते. म्हणून आपण आपल्या क्षेत्रात काही विशेष करत असाल तर जरूर आम्हाला लिहून पाठवा, योग्य ती प्रसिद्धी दिली जाईल. अपेक्षित क्षेत्र, बांधकाम क्षेत्र, माहिती तंत्रज्ञान, खगोलशास्त्र, कोणतेही विज्ञान व इतर. आम्ही आपल्या लिखाणाच्या प्रतिक्षेत राहू.

गेली काही वर्षे आपण आपला कुलवृत्तान्त अद्ययावतीकरण करण्याच्या कामामध्ये गुंतलो आहोत व त्यासाठी निधीची कमतरता जाणवते आहे. तेव्हा जे कुलबांधव यथाशक्ती देणगी देऊ इच्छित असतील त्यांचे स्वागत आहे. हे कार्य मोठे असल्याने आपल्या मदतीची आवश्यकता आहे तरी सहकार्य करावे ही विनंती.

महत्त्वाचे आवाहन : आपला हा 'हितगुज'चा 'ई' अंक सर्वांपर्यंत पोहोचवण्याची जबाबदारी प्रत्येकाने घ्यायची आहे, म्हणजे काय करायचे तर तुम्हाला अंक मिळाला की ताबडतोब आपल्या संपर्कात असणाऱ्या सर्व मराठे कुटुंबीयांना लगेच अंक पाठवून द्यावा. जी तत्परता व्हॉट्सॲपवर मेसेज फॉरवर्ड करण्यासाठी दाखवता तशीच तत्परता येथे अपेक्षित आहे. जेणेकरून सर्व मराठे कुटुंबीय अंक वाचू शकतील. हां, प्रतिक्रिया मात्र अवश्य येऊ देत. कारण सध्या प्रतिक्रिया येणं खूपच कमी झाले आहे. त्यामुळे आपण अंक वाचता की नाही ते कळत नाही.

चला तर मग, आता आपली रजा घेतो. आता भेट सप्टेंबरमध्ये. तोपर्यंत काळजी घ्या व सुरक्षित रहा.

♦

# स्पर्श

• राधा मराठे (पृ. ३७८), पुणे

भ्रमणध्वनी : ९८५०४३३६३१

आज काही झालं तरी सगळी साचलेली कामं पूर्ण करायचीच असं ठरवून सकाळी बाहेर पडले ती सगळी कामं उरकून घरी परत यायला दुपार झाली. घरात शिरले, पर्स-पिशवी टेबलावर ठेवून पाणी प्यायले आणि थेट बाथरूममध्ये शिरले. घाम, धूळ आणि घराच्या बाहेर जाणता-अजाणता झालेले स्पर्श सगळं काही शॉवरच्या पाण्याखाली धुऊन टाकलं. घरात नेसायची धुवट, सुती साडी नेसून जमिनीवर पाय पसरून बसले तेव्हा बरं वाटलं. धुवट कपड्यांचा खसखशीत स्पर्श आणि गुळगुळीत जमिनीचा थंडगार स्पर्श अगदी सुखावून गेला.

खरंच! स्पर्श ही अगदी विलक्षण अनुभूती आहे. किती प्रकारचे स्पर्श अनुभवतो आपण आपल्या आयुष्यात. सर्व भावना केवळ स्पर्शाने व्यक्त करण्याची जबरदस्त देणगी आपल्याला मिळाली आहे. तान्ह्या बाळाला दृष्टी, कान यांच्याही आधी आई ओळखता येते ती स्पर्शानेच. रडणारं बाळ आईच्या स्पर्शासरशी शांत होतं. स्पर्शातून भावना व्यक्त करण्याचं/ओळखण्याचं शिक्षण तिथून सुरू होतं. बाळाच्या अंगावर, डोक्यावर हात फिरवून आई त्याला आपल्या अस्तित्वाची जाणीव करून देते आणि आईच्या आश्वासक स्पर्शाची भाषा कळून बाळ शांत होतं. तान्ह्या बाळाच्या मृदू कोमल स्पर्शानं आईही स्वर्गसुखाचा आनंद अनुभवते.

इतक्या तान्ह्या बाळाला जर स्पर्शाची भाषा कळते, स्पर्श हवासा वाटतो, तर जाणिवा पूर्ण जाग्या झालेल्या मोठ्या/तरुण-प्रौढ माणसांची काय कथा? सहेतुक-निर्हेतुक, जाणीवपूर्वक केलेले-अजाणता झालेले, हवेसे-नकोसे किती प्रकारचे स्पर्श. काही स्पर्श क्षोभ उसळवतात, काही स्पर्श क्षोभ शांत करतात. काही स्पर्श आपल्याकडून काही तरी मागतात, काही स्पर्शातून आपल्याला काही तरी मिळतं. मनाच्या अस्वस्थतेला दूर करणारे आश्वासक स्पर्श मनाला उभारी देतात.

केवळ स्नेहाची भावना जागवणारे स्पर्श आयुष्यात काही तरी चांगलंही आहे याची जाणीव करून देतात. जीवनदान देणारा डॉक्टरांचा स्पर्श आणि तीर्थ घेतल्यानंतर तो ओला तळवा डोळ्यांवर फिरवून मिळणारा थंडावा एकाच जातीचा. कोऱ्या नोटा, कोरी वस्त्रं, नवीन कोरी पुस्तकं यांचे स्पर्श थोडा वेळ का होईना श्रीमंत असल्याचा आनंद देतात. अंघोळ झाल्यानंतर कोरड्या खसखशीत टॉवेलने अंग पुसून वाटणारं हलकेपण हा तर रोज घ्यायचा अनुभव. दिवसभर भटकंती करून थकलेले पाय कढत पाण्याच्या बादलीत बुडवून मिळणारं सुख तर केवळ अवर्णनीय. प्रवासानं थकलेल्या शरीराला पाण्याचा स्पर्श तर स्वर्गसुखाइतका मोलाचा.

अंगावर काटा उभा करणारे स्पर्श आणि अंगावर काटा फुलवणारे स्पर्श यांच्यात जमीन-अस्मानाइतकं अंतर. अंग तापानं फणफणत असताना मायेच्या माणसाचा कपाळावरचा हात आणि तापलेल्या धरतीवर पडणारा पावसाचा पहिला थेंब सारखाच शांतवणारा. नव्याने ओळख झाल्यानंतर हस्तांदोलन करताना झालेला स्पर्श निर्विकार तर बऱ्याच दिवसांनी/वर्षांनी भेटलेल्या जुन्या मैत्रिणीचा हात हातात धरल्यावर होणारा स्पर्श खुशीची कारंजी उडवणारा. निरोप घेताना मारलेली मिठी आणि स्वागत करताना मारलेली मिठी यात तसं पाहिलं तर किती फरक; पण भावनेचा ओलावा मात्र दोन्हीत सारखाच. एका मिठीत स्पर्श साठवून घेण्याची धडपड तर दुसऱ्या मिठीत स्पर्शाची भूक मिटल्याचा आनंद.

इच्छा नसताना होणारे स्पर्श सोसताना होणारी तगमग आणि फार ओढ वाटत असूनही न मिळणाऱ्या स्पर्शासाठी होणारी तगमग यात कुठली जास्त असह्य ते ठरवणं कठीण. नातवंडांचा स्पर्श तर सगळ्या स्पर्शांना फिका ठरवणारा. गळ्यात पडलेले चिमणे हात, गालाशी आलेलं रेशमी जावळ या स्पर्शसुखाइतकं तृप्तीचा अनुभव देणारं दुसरं काही नाही.

किती प्रकारचे स्पर्श. गणती करणं केवळ अशक्य. बुद्धीला होणारा ज्ञानाचा, मनाला होणारा प्रेमाचा/सुखाचा, डोळ्यांना होणारा सौंदर्याचा, कानाला होणारा मधुर ध्वनीचा/संगीताचा, नाकाला होणारा सुगंधाचा स्पर्श माणसाचं जगणं आपापल्या परीनं समृद्ध करीतच असतात. वय, आर्थिक-सामाजिक-शैक्षणिक स्तर, लिंग भेद या सगळ्यांच्या पलीकडे हे स्पर्शसुख माणसाला सारखाच आनंद देतं. आनंदाचा स्पर्श आणि स्पर्शाचा आनंद सारखाच मोठा.

♦

# बंगई, झुला, पाळणा आणि झोका

• संजय रामचंद्र मराठे (पृ.४१६), अमरावती भ्रमणध्वनी : ८२३७९३३०६८/९४२१७४०८९४

**प**रवा माझा पत्रकारितेतला मेंटॉर श्याम देशपांडेचा फोन आला, त्याने सहज विचारले, ''काय करतोय'', मी म्हणालो, ''बंगईवर बसलोय, झुलतोय.'' त्याला एकदम बहिणाबाईंची झुला कविता आठवली. आणि तो म्हणाला, ''बंगई आणि झुला छान ललित स्फुट असे होऊ शकतं. लिही काहीतरी.''

माझे विचारचक्र आणि डोळ्यांसमोर व्हिज्युअल्स सुरू झाले. अनेक खांबी अनेक चौकी मोठ्ठा ऐसपैस वाडा. माजघरातल्या ओसरीवर बंगईवर पाटलीणबाई बसल्या आहेत. दिवाणखान्यात बंगईवर लोडाला टेकून पाटील बुवा रेलून बसलेत. जवळच शिसवी स्टुलावर लखलखता पितळी तांब्या आणि उभट फुलपात्र. बंगईवर जवळच पानाचा पितळी डबा आणि तबकात पितळी डब्यांमध्ये विड्यात घालायच्या सरंजामी वस्तू. पक्ष्यांच्या आकाराचा मोठ्ठा पितळी अडकित्ता, त्यातून पाटील बुवा भली मोठी पांढरी सुपारी कातरून तोंडात टाकताहेत, सोबत मध्येच एखादे चिकण सुपारीचे खांडही तोंडात टाकून चघळत आहेत. तर माजघरातल्या बंगईवर पाटलीणबाईचा थाट काही औरच. ही बंगई सुद्धा साध्यासुध्या लाकडाची नव्हे बरं कां. लाकूड काळ्या शिसमचे नाहीतर अस्सल सागवानीच असे. लाकूड दोनपैकी कोणतेही असो. छान कमावलेले, घासून घोटून चांगले गुळगुळीत केलेले आणि पॉलिशने चकचकीत, पण काय मजाल की पॉलिशचा दर्प येईल. उलट दिवाणखानाभर खशच्या सुवासाची आणि माजघरात चंदनाच्या वासाची दरवळ असे. बंगईच्या कड्याही नाविन्यपूर्ण असत. दिवाणखान्यातल्या पितळी, तर माजघरातल्या स्टेनलेस स्टीलच्या. हा थाट बंगईचा आणि त्यावर ऐसपैस बसणाऱ्या पाटील आणि पाटलीणबाईचा.

झुले हे शेत, वाडी किंवा अंगणात मजबूत झाडाला मजबूत पांढऱ्या दोरखंडाने टांगलेले असत. ह्याची बैठक एकदम लयभारी. मजबूत सागवानी आयाताकार कमी रुंदीचे मजबूत लाकडी दांडके. हल्ली हे वाण लोप पावत चाललंय. यांची जागा बालोद्यानात चिल्ड्रेन पार्कमध्ये, लोखंडी पाइपच्या चौकटीस मजबूत लोखंडी जाड तारांचे तणाव आणि चौकटीच्या मध्ये समान अंतरावर लोखंडी साखळीला टांगलेले चपट आणि अरुंद लोखंडी अँगलला लोखंडी पत्रा वेल्ड करून बनवलेले झुले आणि त्याभोवती गोंगाट करून खेळणारी चिल्लीपिल्ली यांनी घेतली आहे. पूर्वी चैत्रात घरी चैत्रगौर आणि माहेरवाशीण ताई आली की चैत्रगौरीला देव्हाऱ्यात पितळी पाळणा आणि ताईसाठी अंगणात झाडाला झुला हमखास ठेवलेला असे. पंजाबमध्ये झुल्यावर बागडणाऱ्या ललनांच्या घोळक्यात पंजाबी थाटात गाणी बजावणीशिवाय बैसाखीची आपण कल्पनाच करू शकत नाही.

पाळणा म्हटले की, पाळणा आणि त्यातील गुटगुटीत बाळ नजरेसमोर येणारच. जुन्या जमान्यात पणजोबाच्या पाळण्यात लहानपणी न्हाऊ माखून पहिली निद्रा घेण्याचा मान पणतू किंवा पणतीच्या पिढीपर्यंत सहजच चालत असे. आमच्याकडे तर हा सन्मान अनेक पणतू आणि पणतींनी मिळवलेला आहे. बाळंतिणीच्या खोलीप्रमाणे बाळाचा पाळणा अनेक वाड्यांत पिढ्यान् पिढ्या आपले अस्तित्व टिकवून आहे.

रामदरबार वाड्यात आजही तीन बंगया आणि एक पाळणा चार पिढ्यांपासून आपले अस्तित्व टिकवून आहे. यांच्या सोबतीला आता एक पोर्टेबल गार्डन बंगई आणि एक हँगिंग चेअर सुद्धा आहे.

झुला आणि पाळणा यांच्या मिश्र संयोगातून उदयास आलेला आणखीन एक प्रकार म्हणजे, आकाश पाळणा. पूर्वी यात्रेत हे लाकडी असत. आकार साधारणतः दोन पदरी अधिकच्या चिन्हासारखा असतो. आणि माणसंच याला फिरवत. चार टोकाला चार पाळणे. प्रत्येकात चार पाच जणांना बसवून प्रत्येकी चार आणे घेऊन दहा बारा चक्कर पाळणे घुमवत. छोट्या जत्रांची जागा मोठ्ठाल्या मेळ्यांनी घेतली तशी लाकडी आकाश पाळण्यांची जागा इलेक्ट्रिकवर किंवा डिझेलवर चालणाऱ्या उभ्या आणि आडव्या गोल गोल फिरणाऱ्या आकाश पाळण्यांनी घेतली. साहजिकच यांची उंची, घेरा आणि बसण्यासाठी जोडलेल्या पाळण्यांची संख्याही वाढली. उंची आणि वेगामुळे त्यात बसायचे थ्रिल सुद्धा वाढले.

अशी ही बंगई, झुला, पाळणा आणि यावरील विविध लोकांचे झुलणे आणि त्यांचे झोके घेणे यांची ही वर्गवारी ही नमूद करण्याजोगी आहे. पाळणा म्हटलं की नजरेसमोर येतात ती तान्हुली बाळे. आणि मोठेपणी ही पाळण्यात झोपायची हौस भागवण्यासाठी मग पाळण्याचं मोठं रूप येतं, त्याला झोपाळा म्हटले जाते. बंगईवर बसण्याचा आणि त्यावर हलके हलके झुलण्याचा, झोका घेण्याचा मान पाटील बुवा, पाटलीणबाई किंवा त्यांच्या समकक्ष रुतबा असणाऱ्यांचा. झुला हे उंचच उंच झोके घेण्यासाठी सदैव तत्पर असणारी तरुणाईच हवी. आणि आपलं येता जाता बुड टेकवण्यासाठी बंगई आणि पाळणा यांच्यामधल्या पिढीचा झोपाळा. हा ना धड झुला आणि ना धड बंगई असतो. यावर बसून पेपर वाचावा, चहा चाखावा, वाटले तर अभ्यास नाहीतर टाइमपास काहीच नाहीतर निदान एक डुलकी. यावर काहीही करता येते.

असो, अशी ही बंगई, झुला, झोपाळा, पाळणा आणि त्यावर झुलणारी विविध व्यक्तिमत्त्वे यांची ही साठा उत्तरांची कहाणी पाचा उत्तरी सफल संपूर्ण.

♦

# कोरोना काळातील कार्य विशेष

♦ **पुष्कराज वामन मराठे** (पृ.५०३), पुणे

भ्रमणध्वनी : ९८२२१०२०२३

**गे**ल्या वर्षभरात आपल्या प्रत्येकाच्या दिनचर्येत कमी अधिक प्रमाणात बदल झालेला आहे व अनेक नवीन समस्यांना सामोरे जावे लागलेले आहे. या सर्वांना सामोरे जात असतानाच आपण प्रत्येकाने काही ना काही नवीन गोष्टी केलेल्या आहेत व ह्या सर्व गोष्टींमुळे आपल्या वेगवेगळ्या क्षमतांचा विकास नक्कीच झालेला आहे.

मी गेल्या वर्षभरात तीस विद्यार्थ्यांना मिळून सव्वाशे तास वेगवेगळे विषय शिकवले. यात आर्टिफिशिअल इंटेलिजन्स यासारखे नवीन विषय तसेच क्रिएटिव्ह रायटिंग यासारखे वेगळे विषयही होते. यामध्ये मुख्य हेतू विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेला सतत चालना देणे हा होता. हे विद्यार्थी आणि विद्यार्थिनी इयत्ता सहावी ते आठवीमधील होते. हे विषय त्यांच्या अभ्यासक्रमात नव्हते तरी प्रत्येक विषय त्यांच्या वयोगटाला समजेल अशा पद्धतींनी शिकवण्याचा प्रयत्न होता. त्यांना या नवीन विषयासंबंधी जिज्ञासा व कुतूहल निर्माण करण्यात यश आले.

काहींनी याच विषयात पुढील अभ्यास व काम करण्याचे ठरविले आहे.

आर्टिफिशिअल इंटेलिजन्स (ए आय) हा विषय संगणक शास्त्र, गणित व संख्याशास्त्र यावर आधारित आहे. याची व्यापकता दिवसेंदिवस अनेक क्षेत्रांत झपाट्याने वाढत आहे. उदाहरणार्थ हवामान अंदाज, शेती, बँकिंग, मॅन्युफॅक्चरिंग, वैद्यक, तसेच सामरिक इत्यादी. आपल्या कळत नकळत आपण दररोज याचा वापर करतच असतो उदाहरणार्थ मोबाइल ॲप्स, ऑनलाइन खरेदी, यूट्यूब, इत्यादी. आपले एक बांधव डॉक्टर राहुल मराठे (मित्रकिडा या संकेत स्थळाचे जनक) 'ए आय'चा वापर किड्यांच्या विशिष्ट देहबोलीचा अभ्यास करण्यासाठी करीत आहेत.

आपण प्रत्येकाने आपल्या व्यवसायात 'ए आय'चा उपयोग कुठल्या पद्धतीने करता येईल याचा जरूर विचार करावा, यासाठी गरज वाटल्यास आपण ऑनलाइन चर्चा नक्कीच करू शकू.

'ए आय'साठी लागणारा सर्वात महत्त्वाचा घटक म्हणजे 'डेटा'. 'डेटा' म्हणजेच व्यक्ती/घटना/ग्राहकांच्याबद्दलची माहिती, त्यांच्या सवयी, त्यांच्या आवडीनिवडी, त्यांचे आर्थिक व्यवहार, त्यांच्या पोस्टमधून प्रसारित होणारे विचार, मते, वगैरे. अनेक स्वरूपात आपण आपला डेटा कळत नकळत इतरांना देत असतो. येत्या काळात याबद्दलची जागरुकता आपल्यात वाढविणे अत्यावश्यक आहे. 'पर्सनल डेटा प्रोटेक्शन बिल' हे एक महत्त्वाचे पाऊल भारत सरकारच्या विचाराधीन आहे ज्यायोगे प्रत्येक व्यक्तीचा डेटा त्याच्या पूर्व परवानगीनेच इतर संस्थांना वापरता येईल व त्याचा गैरवापर रोखता येईल.

अनेक देशांत गेल्या दशकात या विषयीची जागरूकता व कायदे लागू करण्यात आलेले आहेत. या बद्दल आपण ऑनलाइन चर्चा करू शकू व आपले कलेक्टिव्ह नॉलेज वाढवू शकू कारण पुढील काळात याचे महत्त्व अनन्यसाधारण होणार आहे.

आपण सर्वांनी अनेक वेगवेगळे उपक्रम केले असतील ते व्हॉट्सॲपच्या माध्यमातून ज्ञात होत आहेतच तरी प्रत्येक 'हितगुज'च्या अंकात असे एक सदर असावे असे वाटते.

या सदरात आपण अभ्यासलेल्या नवीन किंवा वेगळ्या विषयाबद्दल/कामाबद्दल माहिती सादर करावी जेणेकरून आपल्या इतर बंधू बांधवांना या विषयाबद्दल ज्ञान मिळेल.

♦

# नाव गेलं तर काय राहील?

• श्री. रघुवीर विष्णू मराठे (पृ. ४१२), वडोदरा भ्रमणध्वनी : ९८७९१८१८३३

मिसरच्या लोकांची अशी समजूत होती की, सावलीप्रमाणे नाव सुद्धा व्यक्तीचा एक जिवंत हिस्सा आहे. भारतीय विद्वानांच्या मान्यतेप्रमाणे नाव त्या व्यक्तीच्या नसानसामध्ये भिनलेले असते. नावाने हाक मारली की मन कसं अगदी भरून येतं. का तर त्यात आत्मीय भाव मुरलेला असतो. व्यक्तीचं नाव युगानुयुगे जिवंत रहात असते आणि यशसुद्धा नावानेच प्राप्त होतं आणि ते सुद्धा त्याच्यामुळेच तयार होतं. भाषेच्या आविर्भावानेच नामकरणाची परंपरा चालू झाली असावी. ह्यात नवीन अस काहीही नाही नावावर गुंफलेलं आडनाव ---.

आता काय झालंय, व्यक्तीचं नाव हळूहळू हरवत चाललं आहे. शेजारी रहात असून सुद्धा माहीत नसतं त्याचप्रमाणे ऑफिसमध्ये सुद्धा सहकर्मचारी एकमेकांना नावाने ओळखण्याचा बिलकुल त्रास घेत नाही. माहीत असायला हवं अशी जरूरच वाटत नाही. एक प्रसंग आठवतो, एका बाईने माझ्या घराची बेल वाजवली दरवाजा उघडत मी विचारले, 'तुम्हाला कुणाला भेटायचं आहे' त्यांनी सांगितलं, 'राजेंद्रांना!' मी सांगितलं ह्या नावाचे कुणी रहात नाही. ह्याच लाईनीत घर आहे असं सांगितलं त्यांनी. त्यांच्याकडे आज होम हवन आहे. होमाच्या अनुषंगाने मी त्यांना सात-आठ घर सोडून बघायला सांगितलं. त्यांना सगळे शाहसाहेब म्हणत असल्यामुळे अन्य रहिवाशांच्याप्रमाणे मी त्यांना ''शाहसाहेब'' म्हणूनच ओळखत होतो. ह्या घटनेवरून माझ्या मनात एक विचार आला की माणूस फक्त त्रिवेदी, शाह, पटेल, दादा ह्यांनीच बनला आहे का? तो फक्त जातीवाचक झाला आहे. ऑफिसमध्ये विचारले की ''देशपांडे साहेब कुठे भेटतील?'' तर उत्तर काय मिळते ''देशपांडे साहेब?'' इथे चार देशपांडे आहेत. असं जेव्हा म्हटलं जातं तेव्हा मनात एक विचार पटकन येतो तो म्हणजे विचारणारा सरळ आणि ज्याला विचारलं तो सदाशिवपेठी. कपाळावर आठ्या असं का? आता बायकांना पण सौ. मेहता, सौ. मराठे, सौ. संधे, सौ. सरंजामे, सौ. पटवर्धन, सौ. पुणेकर, सौ. मनोहर संबोधून आधुनिकतेचा आव आणला जातो. मला पण कुणा व्यक्तीचं नाव विचारल्याबरोबर आडनाव विचारतात अशा वेळी राग तर खूप येतो पण मग शांततेने विचारतो, नाव तुमच्यासाठी पुरतं नाही का? का सगळे दुसऱ्याची जात समजून घ्यायला मागतात. आता आपल्याकडे पश्चिम दिशेचं वारं वाहायला लागलं आहे. फॉर्म भरतेवेळी नावाच्या आधी आडनाव लिहिलं जातं म्हणजे जातीवाचक आधी. नावात परमेश्वर ..... असभ्य नाव कधीही ठेवले जात नाही, ह्यासाठी खूप मेहनत आणि विचारमंथन करायला लागते. आपल्या देशांत पूर्वी देवांवरून नावे ठेवली जात असत. जेणेकरून हाक मारली की परमेश्वराचं नांव घेतलं जायचं. ''अजामेळ'' (जो दुराचारी आणि पापी होता) शेवटल्या श्वासाच्यावेळी आपल्या मुलाला बोलावतो आणि अनायासे त्याच्या तोंडून ''नारायण नारायण'' निघून जातं. विष्णू त्याच्यासमोर प्रगट होऊन त्याचा उद्धार करतात. नावाचं महत्त्व किती आहे ते ह्या उदाहरणावरून कळतंच म्हणून नामकरण हा एक संस्कार आहे. माणूसच नाही तर घर, ऑफिस, व्यावसायिक स्थळ, गाव, शहर सगळं नावानेच ओळखलं जातं. स्वतःच्या घराचं नाव पण आपण समजून, उमजून विचार करूनच ठेवतो, सलाह, सूचना विद्वानांच्या घेऊनच!

नाव हीच खरी ओळख --- एका अन्वेषणांनुसार नवीन पेन खरेदीच्या वेळी ती तपासून घेताना जेव्हा कागदावर रेखाटन करतो तेव्हा आपण स्वतःचे नाव लिहून पाहतो, सांगण्याचा मतितार्थ हा की नाव सगळ्यांना प्रिय असतं का नसतं? नावात अद्भुत शक्ती एकवटलेली आहे. नावांच्या ह्या अधिकारामुळे स्वयं सर्जनहाराला पण आश्चर्य वाटलं होतं. सागरसेतू बांधताना ''राम'' लिहून जे पत्थर पण त्यात टाकले जात होते ते तरले जात होते पण रामाने जेव्हा दगड स्वतःच नाव लिहून पाण्यात टाकला तो बुडून गेला हे बघून रामालाही आश्चर्य वाटले. रामापेक्षा रामाचं नाव मोठं आहे. नाव कमावणं, नाव मिळवणं, नाव रोशन करणं, नाव तसे गुण वगैरे वाक्प्रचार बरेच प्रसिद्ध आहेत. नाव कमावणं म्हणजे प्रसिद्धी मिळवणे हे माणसाचे मोठ्ठे लक्ष्य असते. असं म्हणतात व्यक्तीच्या नावात नावाप्रमाणे गुणही प्राप्त होतात म्हणून नाव तसे गुण असा वाक्प्रचार झाला. जेव्हा नाव व्यक्तीच्या रोमारोमांत भरलं जातं तेव्हा त्याचा प्रभाव

मनावर पण पडत जातो. आदर्श व्यक्तीवरून नाव ठेवण्याचा हेतू हाच आहे. ती व्यक्ती नावाप्रमाणे वागू लागते. अलबत अपवाद आणि विरोधाभास पण बघायला मिळतात. सुयोधनचे दुर्योधन होणं हे मोठ्ठं उदाहरण आहे. नावात एक प्रकारची जादू असते. घरालासुद्धा नाव असतं, कधी कधी लाडात मोठ्या माणसांच्या तोंडून काही तरी शब्द निघून जातात आणि तेच नाव जिभेवर रहाते. हितावह हे की नाव सुबक आणि चांगलं असावं. नावावरून कुठला आहे ते न कळता त्यांना त्यांच्या बोलीवरून तो कुठला आहे ते कळतं. समजा काय बे म्हटलं किंवा अबे यार म्हटलं की बडोदा. अनुनासिक स्वरातून बोलला की चक्क पुण्याचा.

♦

## सहवेदना

डॉ. सुधाकर जनार्दन मराठे यांचा जन्म दि. ३१ ऑगस्ट १९३८साली वाई येथे झाला. त्यांचे गायनातील प्राथमिक शिक्षण कै. मोरेश्वर मराठे यांचेकडे झाले.

पुढील संगीत शिक्षण आपले वडील जनार्दन मराठे यांच्याकडे १८ वर्षे तालीम घेऊन १९६३ मध्ये 'डॉ ऑफ म्युझिक' ही पदवी परीक्षा संपूर्ण भारतौत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाले. डॉ. सुधाकर मराठे हे आकाशवाणीचे प्रथम श्रेणीचे रेडिओ कलाकार होते.

डॉ. मराठे यांनी मैफिलीत आपली गायन सेवा प्रस्तुत केली. सुप्रसिद्ध ग्वाल्हेर घराण्याचे गायकीचे विविध पैलू आपल्या गायनातून सादर करीत स्वतःची ऐक शैली निर्माण केली. विशेषतः ख्याल गायनाबरोबर टप्पा, ठुमरी, भजन, गझल सादर करत असत. वेगवेगळ्या तालातील बंदिशी आपल्या गायनात सादर करत. नवनवीन प्रयोग करण्यात यशस्वी होत. चक्रीभजन देखील ते तेवढ्याच ताकदीने सादर करत.

डॉ. मराठे यांनी पं. चतुर्भुज राठोड, कै. उस्ताद गुलाम ख्वाजा आदी मोठ्या कलाकारांबरोबर जुगलबंदीचे बहारदार कार्यक्रम केले.

त्यांना अनेक पारितोषिके देऊन सन्मान केला गेला. विशेष म्हणजे २०१० मध्ये सवाई गंधर्व महोत्सवात त्यांना सन्मानित करण्यात आले होते.

कै. पं. जनार्दन मराठे आणि डॉ. पं. सुधाकर मराठे यांनी पुण्यात रास्ता पेठ येथे 'श्री गांधर्व महाविद्यालय'ची स्थापना १९३५ साली केली. २०१२ पर्यंत यशस्वीपणे वाटचाल सुरू ठेवली.



त्यांचा शिष्यवर्ग मोठा होता त्यात सुप्रसिद्ध संगीतकार कै. श्रवण राठोड (नदीम आणि श्रवण जोडी) सुधाकर चव्हाण, धनंजय मराठे, भजन सम्राट सुनील भोग, संध्या केळकर इत्यादी.

डॉ. मराठे गेले बरेच वर्षे आपल्या तब्येतीशी झुंज देत वयाच्या ८० वर्षापर्यंत ते संगीत शिकवत तसेच तालीम देणं चालूच होते. नोटेशनवर विशेष प्रभुत्व होतं. कोणत्याही बंदिशी तसेच गाण्याचे नोटेशन ते सहज करत होते.

दीर्घ आजारपणात १ एप्रिल रोजी त्यांना देवाज्ञा झाली. त्यांच्या आत्म्याला शांती लाभो हीच प्रार्थना. त्यांचे मागे पत्नी, ३ मुले, सुना, नातवंड असा परिवार आहे.

संगीत शिक्षणाचा वारसा सध्या त्यांचे चिरंजीव धनंजय मराठे समर्थपणे चालवत आहेत.

आपला,

**धनंजय सुधाकर मराठे** (शिष्य)
मो. ९९२२१ ३६६६५.
वारजे पुणे.

# माझे मिश्कील पण प्रेमळ आजोबा
# कै. रामचंद्र शिवराम मराठे

• विजय मराठे भ्रमणध्वनी : ९४२३०११९४९



**आ**ज काय मनात आले की माझे आजोबा कै. वैद्य रामचंद्र शिवराम मराठे यांचे गुरू पौर्णिमा या दिवशी पुण्यस्मरण म्हणून काही आठवणी लिहाव्यात असे वाटले. त्यांना आम्ही सर्व जण भाऊ म्हणत असू. त्यांची आई पार्वती (माई). भाऊंच्या जन्मापूर्वीच त्यांचे वडील कै. शिवराम मराठे यांचे निधन झाले होते. भाऊंचा जन्म गुरूपौर्णिमा या दिवशीचा. पितृछत्र हरपल्यामुळे लहानपण आपल्या मामांकडे (रावजी जोशी, जोगेश्वरी मंदिर, बुधवार पेठ, पुणे) यांचे कडेच झाले. अनंत अडचणींवर मात करून ते वैद्य झाले. कालांतराने त्यांचे वास्तव्य म्हाळसाकांत मंदिर, बुधवार पेठ, पुणे येथे जवळपास वयाच्या ६० वर्षांपर्यंत होते. त्या काळात कै. योगी भावे महाराज यांचा सहवास लाभला. त्यामुळे ते देवळात जास्त रमले. नंतर कै. सुशिला गोखले यांचेबरोबर विवाह झाला. भाऊंना विष्णू (अरविंद) सुधा, चिंतामणी ही मुलं होती. आता (हयात नाहीत) अरविंद विद्युत अधीक्षक होता, सुधा लग्नानंतर लोणावळ्याला कै. पांडुरंग जोशी कुटुंबात सुखी होती. चिंतामणी पण पशुवैद्य होऊन काही काळ परदेशात गेला. आल्यावर प्रसिद्ध कै. माधवराव डिंगणकर (सुयोग मंगल कार्यालय पुणे) यांची मुलगी कै. शशिकलाबरोबर विवाह झाला. ती हिंदीत डॉक्टरेट होती.

भाऊंची नातवंडे प्रमोद, विजय, आनंद, महेश, जयश्री, राजश्री, सुप्रिया, पल्लवी, पतवंड प्रसाद, चैतन्य, प्रज्ञा, अपूर्वा, धनश्री, अथर्व. ३ वेळा मावंद (पतवंडानंतर सुवर्ण फुलं उधळणं)

कै. शशिकला हिला लग्नानंतर अभ्यासासाठी वाराणसी येथे उच्च शिक्षणासाठी जावं लागलं तेव्हा भाऊ तिच्या सोबत वाराणसी येथे राहिले होते. वाराणसी मध्ये भाऊंना गंगेत स्नान करताना त्यांचा डाव्या हाताचा खांदा निखळला. काही प्राथमिक उपचार करून ते पुण्यात आले. पुढे त्यांना शिंक आली तरी खांद्याला हाताने धरून ठेवावे लागत होते. वैद्यकीय सेवा देण्यासाठी पूर्वीची वेताळ पेठ (आत्ताची गुरुवार पेठ) एक दवाखाना चालू केला होता. कालांतराने ज्येष्ठ वैद्य कै. नानल शास्त्री आणि काही जणांसह कै. भाऊंचाही पुण्यात आयुर्वेद रसशाळा संस्थेच्या स्थापनेत महत्त्वाचा सहभाग होता. काही काळ तेथेच कामही केलं. पुण्यातील नामवंत शिक्षण संस्था राष्ट्रीय शिक्षण मंडळात कार्यरत होते तसेच टिळक महाराष्ट्र विद्यापीठात ते कार्यकारी मंडळात कार्यरत होते. काही काळ मुंबईत मॅजेस्टिक सिनेमासमोर वास्तव्य. आयुर्वेद रसशाळेचे दुकान होतं, त्याच वेळी मुंबई बंदरात जहाजावर मोठा स्फोट झाला होता.

त्यांना योगी कै. गुळवणी महाराज, कै. कविश्वर, कै. मामा देशपांडे (या सर्व ठिकाणी मला घेऊन जात असत) यांचा सत्संग लाभला होता. जवळच त्यांचे एक मोघे म्हणून मित्र रहात होते. दर ३ महिन्यांत आम्ही दोघं जात होतो. तसेच कै. सोनोपंत दांडेकर यांचा पण सत्संग लाभला.

जगतमाऊली संत ज्ञानेश्वर महाराजांच्या दर्शनाकरता वेळोवेळी श्री क्षेत्र आळंदी येथे जात होते.

संपूर्ण आयुष्यभर म्हाळसाकांत मंदिर बुधवार पेठ येथे आपली सेवा भक्तिभावाने करत. कै. अण्णासाहेब भावे पुण्यतिथीचे औचित्य साधून श्री खंडोबाचे अवतार महात्म्य व मार्तंड भक्त कै. अण्णासाहेब भावे महाराज चरित्र दि. १४.८.१९७३ प्रकाशित केले.

वैद्यकशास्त्राची उत्तम जाण, योग्य निदान, नाडीपरीक्षा असल्याने मोठमोठ्या व्यक्ती आयुर्वेदिक औषधोपचाराकरता वरचेवर येतं असत. (आपल्या सुप्रसिद्ध गायिका लता मंगेशकर आणि आशा भोसले या दोघींनाही वैद्यकीय सल्ला तसेच काही औषधोपचार केले पण त्याचा कोठे गाजावाजा केला नाही. एखादा पेशंट त्यांच्याकडे औषधोपचारासाठी आला की तो परत इतर कोणत्याही डॉक्टरांकडे जात नसे. एक पुण्यातील सुप्रसिद्ध रेडिओलॉजिस्ट (डॉ. किनरे) काही उपचारासाठी आले होते. सर्व डॉक्टरांचे उपचार झाले पण अजून काहीच फरक पडत

नाही म्हणून भाऊंकडे आले आणि साधारण ३ ते ४ महिन्यांत ते खणखणीत बरे झाले.

एखाद्या पेशंटनी संपर्क साधला नाही तर ते पत्रं पाठवत. वेळ प्रसंगी जोड पत्रं पाठवायचे तरी पत्र उत्तर आले नाही तर स्वतः फोन करून विचारपूस करत. (असे वैद्य निराळेच)

त्यांना लहान मुलांची खूप आवड होती. मला आठवतंय ते सर्वसाधारण ३ ते ४ महिन्यांत एकदा तरी लोणावळ्याला मुलीकडे आवर्जून जात असत. काही वेळा मलाही बरोबर घेऊन जात असत. एकदा आम्ही भावंड आणि भाऊ चार दिवस राहण्यासाठी लोणावळ्याला सकाळी गेलो पण त्यांना दम्याचा खूपच त्रास होत होता. म्हणून आम्ही सर्व जण परत पुण्यात आलो. आम्हा सर्व भावंडांना दरवर्षी न चुकता गणेशोत्सवात दररोज संध्याकाळी घेऊन जात आणि त्या देखाव्यात काय केलं आहे याची माहिती पण सांगायचे. एकदा आम्हा नातवंडांना घेऊन श्री क्षेत्र विठ्ठलवाडी (आताचा सिंहगड रोड) येथे आषाढी एकादशी दिवशी गेले होते. खूपच गर्दी होती पण योगायोग दर्शन झाले. साठ वर्षांनंतर सुद्धा मला कित्येक वेळा सायकलवरून फिरायला नेल्याचे मला आठवतंय.

त्यांचे मेव्हणे कै. शंकरराव मराठे (ठाणे) विशेष स्नेह यांच्याकडे दरवर्षी एकदातरी जात असत. कधी मला पण बरोबर घेऊन जात असत किंवा मार्गशीर्ष महिन्यात खंडोबा नवरात्र उत्सवात या दोघांची भेट नक्कीच होत होती.

पं. वसंतराव गाडगीळ पुण्यात दरवर्षी ऋषीपंचमीला ऋषीतुल्य व्यक्तींचा सत्कार करीत. त्यांत एकवर्षी कै. भाऊंनाही ऋषितुल्य वैद्य म्हणून पुरस्कार मिळाला होता.

ठाणे येथील ज्ञानेश्वर सेवा मंडळात दरवर्षी कार्यक्रम होत असत. तेथे ते जात असत. एकदा तेथे प्रवचन पण झालं होतं.

कधी आनंदाश्रम बाजीराव रोड, पुणे किंवा म्हाळसाकांत मंदिर बुधवार पेठ येथे ज्ञानेश्वरांवर प्रवचने पण कित्येक वेळा केल्याचे मी पाहिले होते.

सदाशिव पेठेत एक पेशवाई म्हणून रानडे यांचं उपाहारगृह होते, तेथे उत्तम मटार उसळ, मिसळपाव, उत्कृष्ट कॉफी मिळत असे. आम्हाला ते कित्येक वेळा नेत असत. अतिशय तिखट चवीने खायचे. स्वतः चांगल्या प्रकारे स्वयंपाक करत असत. त्यांच्यामुळे आम्ही तिघा भावंडांना स्वयंपाक करता येऊ लागला. लहानपणी माझा अभ्यास (इयत्ता ५वी ते ८वी) न चुकता दररोज सकाळी ५.३० ते ७ या वेळेत घेत असत. काही आठवणी कधीच न विसरता येण्यासारख्या आहेत.

आयुष्यात तीन ते चार वेळा नशीबवान असल्याने किंवा कै. भावे महाराज यांची पुण्याई म्हणून मृत्यूजवळ जाऊन परत आले आणि वयाच्या ९८ वर्षापर्यंत जीवन जगले. तोपर्यंत मधुमेह, रक्तदाब किंवा इतर कोणत्याही आजाराने ग्रासले नाहीत.

वयाच्या ५५ ते ६० चे दरम्यान त्यांचं मोठं आतडं काढावं लागलं ते ऑपरेशन रास्ता पेठ येथे डॉ. दादा कुलकर्णी यांचे हॉस्पिटलमध्ये केले. २ दिवसांनंतर डॉ. कमलाकर दातार सुप्रसिद्ध सर्जन (भाऊंचा भाचा) भेटीसाठी आले होते. त्यांनी सहजपणे तपासणी केली तर ऑपरेशन केलेल्या जागी रक्त येत होते. त्यांना तातडीने परत ५ तास ऑपरेशन करावं लागलं. हा भाऊंचा पुनर्जन्मच होता. यामुळे त्यांच्या खाण्यावर निर्बंध आले, तरी पण कधीच हाय खाल्ली नाही. वयोमानानुसार काहीसा दृष्टी दोष, श्रवण दोष होते. शेवटच्या ६ महिने मी आणि माझा आत्तेभाऊ प्रमोद/आनंदा चिंतामणी काकाला व शशी काकूला थोडा आराम मिळावा म्हणून दररोज रात्री झोपायला जात होतो.

सरतेशेवटी २३ डिसेंबरला काकांचा रात्री ८.३० वाजता फोन आला की आज काही लक्षणं बरोबर वाटत नाहीत तू येच, तसेच तुम्ही सर्व जण याच असा निरोपच होता.

घरघर लागलीच होती. रात्री ११.४० वाजता काका म्हणाला तू जरा विश्रांती घे असे सांगण्यात आले म्हणून मी जरा पडलो तेवढ्यात काका सांगत आला, भाऊ आता आपल्यात नाहीत. हे ऐकून मी उडालोच जवळपास असूनही शेवटच्या क्षणी लांब होतो याची खंत अजूनही वाटते. कायम जवळ असणारे भाऊ शेवटी न भेटताच निघून गेले.

शेवटपर्यंत म्हणायचे की मी नक्कीच वयाची शंभरी गाठीन पण नियती वेगळीच असते.

आठवणी खूपच आहेत पण मर्यादा असतात.

◆

## हसरे हितगुज

**महिलाः–** साहेब, माझे पती गिरणीवर दळण आणण्यासाठी बाहेर गेले होते, ते गेले तीन दिवस झाले परत आलेच नाहीत.

**पोलीस इंस्पेक्टरः–** मग गेले तीन दिवस तुम्ही काय करत होता?

**महिलाः–** काय करणार... साहेब... परवा उपीट केले, काल कांदा पोहे आणि आज शेवटी खिचडी लावली.

# आनंदी इंद्रधनुष्य

• श्यामला पुरंदरे (पृ. ७५५), पुणे भ्रमणध्वनी : ९४०५८४५९८४/९४०३६२५७२४

सर्वांचा लाडका श्रावण मास. इंद्रधनुष्य तयार व्हायला हलकी रिमझिम व तीमधून जाणारे सूर्यकिरण हवेत. तद्वत गुरूपौर्णिमेचा सोहळा संपन्न करण्यासाठी प्रसन्न सत्विचारांच्या निर्मळ पाऊसधारा व निखळ आनंदाचे कोवळे किरण एकत्र येतात. मग शिष्यांच्या ओंजळीत सुखाच्या इंद्रधनुष्याचे रंग छानपैकी खेळू लागतात. असाच अपूर्व अनुभव आम्हा साधकांस व्यासपौर्णिमेच्या उत्साही सायंकाळी सौ. आशाताई बिंदुमाधव जोशी यांच्या पवित्र वास्तूमध्ये लाभला. या आमच्या गुरुवर्या भगवद्गीतेमधील श्लोक घेऊन श्रीज्ञानेश्वरीमधील संबंधित ओव्यांचा अर्थ समजावून देतात. मग सर्वजणी एकत्र श्लोक म्हणतात. गुरुवर्यांच्या निरुपणानंतर एकेक ओवी स्वतंत्रपणे वाचतात. या सर्व सुसंस्कारांचा परिणाम म्हणजे चांगल्या विचारांच्या लहरी मनात तरंगतात व कृतीत उतरतात.

विश्वनिर्मात्याला मनापासून निरपेक्ष भावनेने आळविलं की तो प्रेमाच्या धाग्याने बांधला जातो. त्याला प्रसन्न करण्यासाठी ज्ञानेश्वर माऊली, जगत् गुरू तुकाराम, नामदेव महाराज, जनाबाई असे असंख्य आदर्श संत शब्दांच्या रूपात पिढ्या पिढ्यांचे सांगाती झाले आहेत. इसलिए तो कहते है: 'प्रभू का यथार्थ दर्शन करना है, तो संतों के साथ जाना है!' इथे श्रीरामप्रभू व लक्ष्मण यांचं उदाहरण डोळ्यांसमोर आहे. श्रीरामचंद्र वनवासासाठी निघताना फक्त सीतामाई व लक्ष्मण यांनाच बरोबर घेतात. भरत त्यांच्या भेटीला निघाला असताना सर्व लोक तसेच जंगलामधील भिल्लांनापण आपल्याबरोबर घेतो. म्हणजेच भरत हा सत्युगातील संत होय तर श्रीरामप्रभू ईश्वर आहेत.

या सर्व देवांचं मुख्य वैशिष्ट्य म्हणजे त्यांचा अवर्णनीय असा प्रेमळ स्वभाव होय. प्रेम म्हणजे दुसऱ्याची काळजी घेणे, दुसऱ्यास देत राहणे, जो भक्त श्रद्धेने त्यांच्या चरणी लीन होतो त्याला ते हृदयाशी धरतात. एका गावात दुष्काळ पडतो. इंद्रदेवाची प्रार्थना करण्यासाठी गावकरी मंदिरात जमतात. एक चिमुरडा छत्री उघडून उभा राहतो. कारण त्याचा पूर्ण विश्वास होता की तळमळीने आळविलं की देव पाऊस पाडणारच. याच विश्वासाने संत कबीर नामसंकीर्तन करत असताना कौसल्यापुत्राने विणलेला शेला घेऊन उभे असतात. जाणारे-येणारे यात्रेकरू त्याच्या उत्कटभक्तीची स्तुती करू लागले. तेव्हा स्वतःच्या रसाळ वाणीत कबीराने त्यांना दोहा ऐकविला: 'कबीर कबीर क्या कहे, जा जमुनाके तीर! एक एक गोपीके प्रेमसे, कह गए कोटी कोटी' कबीर!, गवळणींच्या निर्मल साधनेमुळे' यमुना आनंदाने दुथडी भरून वाहू लागली व मुरलीधराने सर्वजणींचे शेवटपर्यंत रक्षण केले.

काही गोष्टी केवळ पाहून कळत नसतात तर प्रत्यक्ष अनुभवाव्या लागतात. गुरुकृपेने परमात्म्याच्या अनुभवाची व्याप्ती वाढते जेणेकरून योग्य मार्गावर चालण्याची स्फूर्ती मिळते. एपिक्युरस हा एक ग्रीक तत्त्वज्ञ होता. शाळेत असताना त्याने शिक्षकांना विचारलं, 'ही पृथ्वी कोणी, केव्हा व कशी निर्माण केली?' सर वदले 'अरे, तुझ्यासारखा कुशाग्र, चौकस, विचारी व अभ्यासू विद्यार्थी भविष्यात या प्रश्नाचे उत्तर नक्की शोधेल.'

अहंकाराने भरलेल्या बांबूला आतून पोकळ बनवून सूर सजविणारी बासरी बनविण्याची किमया गुरूच करू शकतात. यावरून एका प्रसंगाचा आठव आला. झेन गावामध्ये नान इन नावाचे एक गुरुजी राहत होते. एक विद्वान प्राध्यापक त्यांच्याकडे ज्ञानप्राप्तीसाठी जातात. नान इन यांनी कपामध्ये चहा इतका भरला की तो बशीमध्ये सांडला. असे वारंवार घडले. प्राध्यापकाने याबद्दल शंका विचारल्यावर गुरूने उत्तर दिले: 'महाशय, या कपाप्रमाणेच तुमचं मनदेखील विद्वत्ता, विचार, विविध मते यांनी ओतप्रोत भरलं आहे. यामुळे मी अजून ज्ञान देऊ शकत नाही.' प्राध्यापकांनी खजिल होऊन अहंकार तसेच पूर्वग्रह याना लोटून देऊन ज्ञानकर्म मिळविण्यास आरंभ केला. संत ज्ञानेश्वरांनी श्रीभगवद्गीतेचे ज्ञानेश्वरीत भावार्थ निरुपण करून कर्मयोगाचा सिद्धांत विशद केला व माझ्यासारख्या सर्वसामान्य व्यक्तीचे गैरसमज व अज्ञान नष्ट होऊन ज्ञानाचे भांडार खुले होते. आता श्रद्धेबद्दलची ही छोटीशी गोष्ट पाहू या.


रिंगण या चित्रपटातील छोटा अबडू ज्याची आई देवाघरी गेलेली असते. मग तो विठूरायाला साकडं घालतो की, 'बाप्पा,

मला माझी आई शोधायला मदत कर.' आईला पत्र पाठवितो की मी तुला त्रास देणार नाही, तुझ्या कुशीत मला निवांत झोपायच आहे. आम्हा आशाताईंचं उबदार घरकुल देखील सर्वांना अशीच ओढ लावून हात जोडून जणू काही निमंत्रण देत: 'या घर आपलंच आहे.' मग आपलीही पावले तिकडे आपोआप वळतात.

लक्षावधी श्रद्धामेघ टाळ-मृदुंगाच्या गजरात पंढरीकडे निघतात जेणेकरून वाळवंटाचीही मखमली हिरवळ होते. त्याचप्रमाणे डॉ. बिंदुमाधवसर व सौ. आशाताई या लक्ष्मीनारायणांच्या आशीर्वादामुळे आम्हा सर्वांचं मन शांत, स्थिर व समाधानी राहतं. आयुष्यात सुंदर क्षणांची वाट पाहण्यात वेळ न घालविता जो क्षण येईल तो चांगल्या रीतीने सुंदर करण्याचा प्रयत्न करायचा ही वृत्ती जोपासली जाते. आम्हां गुरुवर्यांची नातवंडे अदबशीर वागणारी आहेत. तसाच प्रयत्न करण्यासाठी आम्हाला बळ दे ही कृपाळू, ईश्वरापाशी एकमेव प्रार्थना! ♦

# रसिकप्रिय गायक

**ज्येष्ठ** गायक पं. सुधाकर मराठे यांच्या निधनामुळे ग्वाल्हेर घराण्याचा एक दुवा आणि अनेक शिष्य घडविणारा संगीतगुरू काळाच्या पडद्याआड गेला आहे. गंधर्व नाटक कंपनीतील अभिनेते पं. जनार्दन मराठे यांचे ते चिरंजीव. गायनाची उपजत आवड पाहून वडिलांनी त्यांना गायक म्हणून घडविण्याचे ठरविले. सहाव्या वर्षापासूनच मराठे यांनी गायनाचे धडे गिरविताना दररोज सहा ते सात तास रियाझ केला. ग्वाल्हेर घरण्याच्या गायकीचे संस्कार झालेल्या पं. मराठे यांनी पुण्यातील सवाई गंधर्व महोत्सवापासून ते देशभरात अनेक मान्यवर महोत्सवांत गायन आणि शेकडो स्वतंत्र मैफिलीही केल्या. राग आणि लयीवर प्रचंड हुकूमत असलेले पं. मराठे काही क्षणांतच श्रोत्यांची पकड घेत. गायनातील जोम आणि पल्लेदार तान अशी ग्वाल्हेर घराण्याची वैशिष्ट्ये त्यांच्या गायकीत उतरली होती. या घराण्यातील दिग्गज गायकांची परंपरा पुढे चालवितानाच पं. मराठे आपला वेगळा ठसा उमटविण्यासाठी सतत प्रयत्नशील राहिले. ख्याल, ठुमरी, तराणा, टप्पा आणि भजन अशा गायनाच्या विविध दालनांमधून त्यांनी सहजी विहार केला. प्रत्येक मैफिलीत एखादा नवा अनवट राग सादर करून ते रसिकांची मने जिंकत. दिवंगत पंतप्रधान लालबहादूर शास्त्री, मोरारजीभाई देसाई अशा मान्यवरांनी पं. मराठे यांच्या गायनास दाद दिली. रंगतदार सादरीकरणासोबतच त्यांनी गायनाच्या तत्त्वज्ञानाचाही अभ्यास केला. अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळामध्ये त्यांनी पंचविसाव्या वर्षीच 'ग्वाल्हेर घराणे' या विषयावर संगीतामध्ये देशभरात प्रथम क्रमांकासह डॉक्टरेट मिळविली. ते आकाशवाणीचे प्रथम श्रेणीतील गायक होते. गायनाबरोबरच संगीताच्या अध्यापनातही त्यांचे स्थान मोठे आहे. तब्बल पाच दशके त्यांनी संगीताचे शिक्षण दिले. वडिलांसोबत त्यांनी गांधर्व महाविद्यालयातून अनेक शिष्य घडविले. प्रख्यात गायक पं. चतुर्भुज राठोड यांच्याबरोबर त्यांनी ख्यालगायन आणि चक्रीभजन यांच्या जुगलबंदीचे अनेक कार्यक्रम सादर केले. पं. राठोड यांचे चिरंजीव आणि नदीम-श्रवण जोडीतील संगीतकार श्रवण राठोड यांच्यासह धनंजय मराठे, सुधाकर चव्हाण असे शिष्य पं. मराठे यांनी घडविले. पं. मराठे यांना मराठे प्रतिष्ठानद्वारे श्रद्धांजली.



*म.टा. सोम. ५ एप्रिल २०२१*

## सुविचार

कबीर, कबीर क्या कहते है। जाओ जमुना के तीर
एकेक गोपी के हृदय मे, बह गये शतकोटी कबीर
**– संत कबीर**

# स्वातंत्र्यवीर सावरकरांचा शिक्षणविषयक दृष्टिकोन

• डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे (पृ.१२०), वडाळा दूरध्वनी – ०२२ २४१५०८८९



**शि**क्षण म्हणजे ज्ञानसंपादन सावरकरांच्या चरित्राचा साकल्याने विचार केला की, त्यांच्या जीवनात ज्ञानसाधनेला अनन्यसाधारण महत्त्व असल्याचे लक्षात येते. ज्ञानसंपादन करणे ही त्यांच्या प्रत्येक हेतूपूर्तीच्या प्रयत्नांची पहिली पायरी ठरते. शिक्षण घेणे म्हणजे केवळ निरनिराळ्या विषयात पदव्या मिळविणे इतकाच मर्यादित अर्थ त्यांनी स्वीकारला नव्हता. विद्यापीठाच्या पठडीतच बंदिस्त असलेले ज्ञान म्हणजे शिक्षण असे त्यांना अभिप्रेत नव्हते. त्यांची ज्ञानाची संकल्पना ही अतिशय विशाल आणि सर्वव्यापी होती.

**कर्तव्याची ओनामा**

स्वातंत्र्यवीर सावरकरांनी संपादन केलेले ज्ञान आवश्यकतेनुसार आपल्या देशबांधवांना मार्गदर्शनाच्या रूपात सतत दिले. विशेष म्हणजे अंदमानात असताना त्यांनी तेथील निरक्षर कैद्यांना साक्षर करून वाचण्यास शिकवले. अंदमानात विविध प्रकारचे ग्रंथ बाहेरून बोलावून वाचून काढले.

रत्नागिरीत स्थानबद्ध असतानाही तेथे त्यांनी साक्षरता प्रसाराचे काम केले. आपल्या संपर्कातील लोकांनी शक्य तितके अधिक शिक्षण वाचनाद्वारे संपादन करावे यासाठी त्यांनी सतत कष्ट घेतले.

लंडनमधील वास्तव्यात स्वातंत्र्यवीरांनी पुण्यातील 'काळ' वर्तमानपत्रासाठी बातमीपत्रे पाठविली. त्यातून सिद्ध झालेल्या, 'लंडनची बातमीपत्रे' या संग्रहात ते म्हणतात. ''ज्ञानार्जन आणि ज्ञानदान सतत करीत राहणे हा कर्तव्याचा ओनामा आहे. हा ओनामा जे सतत गिरवीत राहणार ते संत, सज्जन लोकांचे नजरेपुढे सत्यासत्य ठेवण्याचे काम सतत करीत राहणारच आणि सत्यासत्य लोकांपुढे मांडले म्हणजे सत्याची बाजू उचलून धरणे आणि असत्याचा बडेजाव कमी करणे हे स्वभावतः सत्यशील असणारा लोकसमाज करू लागतो.''

स्वतः स्वातंत्र्यवीर सावरकरांनी जीवनातील आपल्या अनेकविध कर्तव्याचा प्रारंभ 'ज्ञानार्जन आणि ज्ञानदान' या तत्त्वानुसार सतत केला. त्यांची ज्ञानलालसा अमर्यादित होती. बालवयातील विद्यालयीन काळात पाठ्यपुस्तकांसह त्यांनी इतर अनेक विषयांवरील पुस्तके आणि ग्रंथ यांचे वाचन केले होते. वाचनालयातील उपलब्ध पुस्तके आणि वृत्तपत्रे त्यांनी वाचली. ज्ञानसंपादनाला त्यांनी कोणत्याही मर्यादा घातल्या नव्हत्या. आपल्या हेतूपूर्तीसाठी, संबंधित सर्वप्रकारचे ज्ञान मिळविण्यावर त्यांचा भर होता. प्रत्येक व्यक्तीने आपल्या हेतूनुसार आवश्यक विशिष्ट ज्ञान संपादन करावे, असे मार्गदर्शन त्यांनी केले. ज्ञानसंपादनाच्या बाबतीत त्यांनी स्त्री-पुरुष, बाल-वृद्ध असा भेद केला नाही. स्त्रियांनी केवळ विशिष्ट प्रकारचे शिक्षण घ्यावे असे त्यांचे ढोबळ धोरण नव्हते. प्रत्येक स्त्रीने आपले ध्येय आणि कर्तव्य यांना अनुसरून शिक्षण घ्यावे अशी त्यांची विचारधारा होती.

स्वातंत्र्यवीरांनी बालवयापासून ज्ञानसंपादनासाठी सुरू केलेले वाचन त्यांच्या जीवनाच्या अखेरपर्यंत चालू ठेवले. आत्मसमर्पणासाठी केलेल्या प्रायोपवेशनाच्या काळात जेव्हा त्यांना स्वतः वाचणे अशक्य झाले, तेव्हा त्यांनी इतरांकडून वाचून घेऊन ग्रंथश्रवणाद्वारे ज्ञान मिळविण्याचे व्रत चालू ठेवले. आत्मार्पणाच्या दोन दिवस आधी त्यांनी श्री. मंकीकर लिखित, 'पाकिस्तान कट् टू साईझ' हा ग्रंथ श्रवण केला.

**ध्येयपूर्तीसाठी अखंड साधना**

स्वातंत्र्यवीर सावरकरांनी केवळ 'शिक्षण'विषयक वेगळे ग्रंथ लिहिले नाहीत. परंतु आपल्या प्रत्यक्ष जीवनकार्यातून त्यांनी ज्ञानार्जन आणि ज्ञानदान कसे आणि किती असावे याचा उत्कृष्ट आदर्श लोकांसमोर ठेवला.

बालवयात त्यांनी, देशाचे स्वातंत्र्य संपादनासाठी सशस्त्र क्रांतीचा मार्ग स्वीकारण्याची प्रतिज्ञा घेतली आणि त्या धोरणाच्या पूर्तीसाठी जीवनभर अखंड साधना केली. आपल्या

देशाचा इतिहास बारकाईने अभ्यासिण्याबरोबर त्यांनी इंग्लंड, फ्रान्स, इटली, रशिया, अमेरिका इत्यादी अन्य देशांच्या इतिहासाचाही सखोल अभ्यास केला. आपल्या सांस्कृतिक आणि पौराणिक इतिहासाची त्यांनी पारायणे केली. स्वतः प्रतिभाशाली कवी असल्याने त्यांनी कालिदास, भवभूती अशा संस्कृत कवींची नाटके आणि काव्य यांचा अभ्यास केला. त्याप्रमाणेच त्यांनी शेक्सपियर, स्कॉट, मिल्टन इत्यादी इंग्लिश कवी आणि लेखकांचे साहित्यही वाचले.

परंतु केवळ प्रकांड पांडित्य संपादन करणे इतकाच मर्यादित हेतू सावरकरांचा नव्हता. आपल्या ध्येयपूर्तीसाठी संघटित केलेल्या सहकारी आणि अनुयायांनासुद्धा अंगीकृत कार्यासंबंधी यथार्थ आणि किमान ज्ञान असावे यासंबंधी त्यांनी कटाक्षाने काळजी घेतली. नाशिक येथील मित्रमेळ्याच्या साप्ताहिक बैठकीत ते सहकाऱ्यांना स्वतः अभ्यासिलेल्या उपयुक्त ग्रंथांचा सारांश सांगत. आपण काय करत आहोत याची जाणीव आणि कार्यकारण मीमांसा आपल्या सहकाऱ्यांना असावी असा त्यांचा आग्रह असे.

पुढे लंडनमध्ये उच्च शिक्षणासाठी गेलेल्या विद्यार्थ्यांना त्यांनी 'अभिनव भारत' या क्रांतिकारी संस्थेत संघटित केले. तेथील साप्ताहिक बैठकीतही ते प्रचलित, भारतीय आणि जागतिक राजकारणावर व्याख्याने देत. क्रांतिकार्यासाठी, त्याकाळी नवीन असलेल्या बॉम्बची विद्याही त्यांनी आपल्या (सेनापती) बापट आदी सहकाऱ्यांना रशिया, फ्रान्स इत्यादी देशातून शिकून येण्यास सांगितले. प्रत्येकाने विज्ञाननिष्ठ असावे म्हणून अद्ययावत विज्ञानाचा अभ्यास सतत चालू ठेवावा असे त्यांनी आपल्या सहकाऱ्यांना आणि अनुयायांना सांगितले. देशभक्त भारतीय युवक-युवतींनी अन्य जीवनावश्यक शिक्षण आणि ज्ञान संपादन करतानाच अपरिहार्यतेने अद्ययावत सैनिकी शिक्षण घ्यावे असा आग्रह त्यांनी आयुष्यभर केला.

**सैनिकी शिक्षण**

प्रथम स्वातंत्र्य संपादनासाठी आणि नंतर स्वातंत्र्य संरक्षणासाठी त्यांनी देशातील युवकांनी आणि नागरिकांनी अद्ययावत सैनिकी शिक्षण अवश्य घ्यावे असे सातत्याने प्रचारिले. कारण ती वर्तमानकाळाची निकड आहे. स्वतः एक विलक्षण प्रतिभाशाली साहित्यिक असतानाही सन १९३८ मध्ये मुंबई येथे संपन्न झालेल्या २८ व्या मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरून, साहित्यिकांना 'लेखण्या मोडा आणि बंदुका घ्या' असा संदेश दिला. देश स्वतंत्र असला तरच श्रेष्ठ दर्जाचे साहित्य निर्माण होऊ शकते असे त्यांनी प्रतिपादन केले.

परकीय ब्रिटिश राजसत्ता उखडण्यासाठी सतत प्रयत्नशील असलेल्या स्वातंत्र्यवीर सावरकरांनी १९३९ मध्ये प्रारंभ झालेल्या दुसऱ्या महायुद्धाच्या काळी देशभक्त तरुणांनी ब्रिटिश सैन्यात भरती व्हावे असा प्रचार केला. ब्रिटिश सैन्यात भारतीय तरुण भरती झाल्यामुळे ब्रिटिशांच्या जर्मनी, जपान, इटली या शत्रूराष्ट्रांशी लढण्याची क्षमता वाढली असती हे लक्षात घेऊनही स्वातंत्र्यवीर सावरकरांनी सैन्य भरतीचे अभियान चालविले. हेतू एकच की देशभक्त भारतीय लोकांनी सैनिकी शिक्षण आणि शस्त्रास्त्र संपन्न व्हावे! हेच देशभक्त भारतीय सैन्य पुढे ब्रिटिशांची सत्ता उखडून टाकण्यासाठी उपयोगी पडेल असा त्यांचा विश्वास होता. नेताजी सुभाषचंद्र बोस ह्यांच्या 'आझाद हिंद सेने'ला असे भारतीय सैन्य उपयोगी पडले.

पुढे खंडित भारताचे स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही स्वातंत्र्यवीर सावरकरांनी सैनिकी शिक्षणाचा आणि अद्ययावत भारतीय सेना उभारण्याचा सतत आग्रह धरला. कारण, अद्ययावत प्रबळ सेनेमुळेच देशाच्या स्वातंत्र्याचे रक्षण होऊ शकते, असे त्यांचे म्हणणे होते. १९६२ साली स्वतंत्र भारताची सैनिकी सिद्धता दुर्बल असल्यामुळे, बलाढ्य चिनी आक्रमणापुढे भारताला पराभव पत्करावा लागला! मात्र १९६५ आणि १९७१ मध्ये पाकिस्तानी सेनेपेक्षा भारतीय सेना बलाढ्य असल्यामुळे आपण विजयी होऊ शकलो, हा अनुभव महत्त्वाचा ठरतो.

भारताची गणना जगातील बलाढ्य राष्ट्रांमध्ये होण्यासाठी भारताने अद्ययावत, शक्तिशाली, अण्वस्त्रादिनी संपन्न अशी समर्थ सेना उभारावी, असे वीर सावरकरांनी प्रचारिले कारण देशाचे आकारमान किंवा मोठी लोकसंख्या यापेक्षा देशाच्या सैनिकी सामर्थ्यावरच राष्ट्रीय मोठेपण ठरविले जाते.

सर्व प्रकारचे शिक्षण आणि ज्ञान संपादन करण्याला स्वातंत्र्यवीर सावरकरांनी यथायोग्य महत्त्व दिले. परंतु राष्ट्रजीवनात प्रचंड सैनिकी सामर्थ्य संपादन करणे आणि त्यासाठी अपरिहार्यतेने सैनिकी शिक्षणाचा अंगीकार अधिक महत्त्वाचा ठरतो, असे त्यांनी प्रतिपादन केले.

स्वातंत्र्यवीर सावरकरांचा शिक्षणासंबंधी आणि विशेषतः सैनिकी शिक्षणासंबंधी असा राष्ट्रहितकारी दृष्टिकोन होता.

स्वातंत्र्यवीर सावरकरांनी त्यांच्या जीवनात सदैव प्रामुख्याने हिंदू समाजाच्या सर्वांगीण हिताचा तर्कशुद्ध विचार करून अचूक

मार्गदर्शन केले. एखाद्या निष्णात धन्वंतरीच्या कौशल्याने रोगाचे अचूक निदान करून, त्यावर रामबाण उपाययोजना सांगावी. त्याचप्रमाणे स्वातंत्र्यवीर सावरकरांनी हिंदू समाजाच्या आणि हिंदू राष्ट्राच्या प्रकृतीचे-प्रवृत्तीचे अचूक निदान करून त्यावर रामबाण उपाययोजनाही प्रकटपणे सांगितल्या.

'सावरकर विचार' आज अंमलात आणले गेले तर देशाचा भविष्यकाळ उज्ज्वल आहे हे सांगायला कोणा ज्योतिषाची आवश्यकता नाही.

आता, उशिराने का होईना निदान 'हिंदुत्व हेच राष्ट्रीयत्व' हे तत्त्व उघडपणे मानण्यास हिंदू संघटना आणि पक्ष सिद्ध झाले आहेत. महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात सैनिकी शाळा चालू केली गेली तर स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या शैक्षणिक धोरणाचा विजय होऊन ते महाराष्ट्राच्याच नव्हे तर अखिल हिंदुस्थानच्या हिताचे आहे.

***सौजन्याने : पुनर्मुद्रित - प्रज्वलंत मासिक***

---

# माझं पुणं

जन्म, बालपण, शिक्षण, नोकरी
सुख, समृद्धी अन् सालस छोकरी,
गवसले मला ज्या भूमीत,
त्रिवार वंदन त्या मातीस ।।

शांत, सुंदर, हवा मस्त निरंतर,
निसर्ग जेथे फुलतो सुंदर,

गणेशोत्सव अन् शिवजन्मासह,
मोहरमही जेथे, सजतो छान,

बंधुभाव अन् प्रेमही सुंदर,
नांदते जेथे सौख्य निरंतर,

मुळा, मुठा अन् अनेक राऊळे,
गणेश, बजरंगाची, शांत देऊळे

हजारो बोळ अन् गल्ल्या खोल
उन्नत सेतू अन् चौकही गोल,
माझ्या पुण्याचे मोल, अनमोल

उंच टेकड्या, मोहक बागा
वाडा शनिवारातला जागा
महाराष्ट्राची शान, विद्येचा मान,
पुणे माझे, विश्वात सुंदर, छान

नाटकं, सिनेमा अन् सवाई,
रुपाली, वैशाली, स्वाद देई,


पुण्यात जर मिळाली दाद,
जगभर मिळते, कीर्ती, मान

मारा टोमणे, करा दुजाभाव
का मिळेल मग तुम्हां भाव?

लक्षात ठेवा जगी सारे,
आमचं पुणं, आम्हा प्यारे

उपकार तुझे हे पुण्यनगरी,
अभिमान तुझा, सदैव उरी ।।

**सुधाकर (बाळ) मराठे,** *बिबवेवाडी, पुणे*







---

# ऋतुमहात्म्य

निशा संपली उषा पातली दिनमणि आला उदया चली।
त्यास कोण हो रोज सांगतो ये तू प्रातःकाली ।।१।।
भानू उगवता, कमलिनी फुलते।
त्याची चाहूल नलिनीला हो कशी लागते ।।२।।
आंब्यावरचा मोहर फुलला, गंध चहूकडे दरवळला।
कोकिळेस त्या कोण सांगतो, वसंत ऋतू आला ।।३।।
कृष्ण मेघ ते गगनी जमता, मयूर करिती नर्तन।
त्यांच्या कानी कोण सांगतो, पर्जन्याचे आगमन ।।४।।
जुने जाउनी, नवे येऊद्या. शिशिर देतसे संदेश।
नवी पालवी, नवे धुमारे, फुटती वेली वृक्षास ।।५।।
सागर लाटा उचंबळति त्या पाहून पूर्ण चंद्रमा।
सागरास हो कोण बोलतो आजच आहे पौर्णिमा ।।६।।
जन्म देतसे सरीतेस त्या पर्वत आणि डोंगर।
वाटाड्या कोणता, दावि तिज, सागर पतीचे घर ।।७।।
मानव वदतो, अगाध आहे परमेश्वर लीला।
नतमस्तक होऊनी, वंदितो महान शक्तीला ।।८।।

**- मंगला मराठे**

# पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर

• डॉ. गिरीश जाखोटिया (पृ. १२९) भ्रमणध्वनी : ९८२००६२११६



**नमस्कार मित्रांनो!**
**दि. ३१ मे, देवी अहिल्याबाई होळकरांची जयंती. त्या निमित्ताने अहिल्याबाईंच्या महान व्यक्तिमत्त्वाचं आणि कर्तृत्वाचं स्मरण करण्यासाठी हा लेखन – प्रपंच!**

अहिल्याबाई जन्मल्या ३१ मे, १७२५ रोजी चौंडी गावी. हे गाव आहे जामखेड तालुक्यात, अहमदनगर जिल्ह्यात. अहिल्याबाईंचे वडील मानकोजी शिंदे हे धनगर समाजातील अत्यंत सुधारकी विचारांचे 'गाव प्रमुख' होते. हुशार 'बाल अहिल्या' आपल्या वडिलांसोबत विविध मूलभूत सामाजिक समस्यांबाबत चर्चा करीत असे. बालविधवा झालेल्या आपल्या मैत्रिणीस तिने न्याय मिळवून दिला. वडिलांना तिने प्रश्न विचारला होता, ''मुलगी विधवा झाल्यास तिने खडतर संन्यस्त जीवन जगायचे. मग हा नियम मुलग्याला का लागू होत नाही?'' अठराव्या शतकात मुलींना शिकण्याचा अधिकार नव्हता. याबाबतही बाल अहिल्याने प्रश्न विचारला होता, ''देवी सरस्वती ही स्त्री असून ती विद्येची देवता आहे, मग आम्हा मुलींना विद्याग्रहणाचा अधिकार का नाही?'' मानकोजींनी ओळखले होते की आपली ही कन्या काळाच्या खूप पुढे आहे.

अहिल्याबाईंना 'माणुसकी'चे महत्त्व सर्वाधिक वाटायचे. यास्तव सर्वांना समान न्याय, दुर्बळांना व निरागसांना संपूर्ण आधार आणि यासाठी 'कल्याणकारी राज्या'ची संकल्पना त्यांना राबवायची होती. अठराव्या शतकातील अहिल्याबाईंचे हे उदात्त विचार एकोणिसाव्या शतकात महात्मा जोतिबा व सावित्रीबाई फुलेंच्या अवाढव्य कार्याचा पाया होता. थोडे मागे गेलो की जाणवते, महात्मा बसवण्णांनी हेच मानवतेचे विचार कार्यान्वित केले होते. सतराव्या शतकात तुकोबारायांनी अवडंबरावर प्रहार करीत हा मानवतेचा झेंडा आणखीनच वर चढवला होता. भारतीय उपखंडाचा मानवी इतिहास हा अशा प्रज्ञावंत सिंधूजनांचा आहे जो स्त्री – पुरुष समानतेचं अद्भुत प्रतीक असणाऱ्या 'अर्धनारीनटेश्वरा'ने देदीप्यमान केलेला होता. अहिल्याबाई या त्या महादेवाच्या निस्सीम भक्त होत्या, ज्या महादेवाने कोणताही भेदाभेद न करता आपले ज्ञानभांडार सर्वांसाठी खुले ठेवलेले होते. अहिल्याबाईंनी आपल्या संपूर्ण कारकीर्दीत तळागाळातील लोकांच्या उत्थापनाचे कार्यक्रम राबविले व त्यांना प्रशासकीय असे स्थायी रूप दिले.

आपल्या स्वारी दरम्यान माळवा प्रांताचे प्रभावशाली सुभेदार मल्हारराव होळकर हे चौंडी गावी मुक्कामास असताना त्यांनी बाल अहिल्येची चौफेर हुशारी व प्राणिमात्रांबद्दलची कणव पाहिली आणि ठरवले की अहिल्याच होळकर खानदानाची सून व्हावी. त्यांनी बाल अहिल्येत कल्याणकारी राज्याची महान राणी होण्याचे सर्व गुण पाहिले होते. मल्हारराव हे स्वतःच्या सनातनी कुटुंबीयांचा व सहकाऱ्यांचा विरोध डावलून बाल अहिल्येला दरबारात उपस्थित केल्या गेलेल्या सामाजिक समस्यांची उत्तरे विचारायचे. बालपणी वडील व लग्नानंतर सासऱ्यांच्या खंबीर सुधारकी आधारामुळे अहिल्याबाई एक उत्तम कल्याणकारी प्रशासक होऊ शकल्या. एका छोट्या गावातील आणि सामान्य कुटुंबातील एक मुलगी होळकरांच्या माळव्यातील राजमहाली येते आणि सर्व अडथळ्यांना पार करीत स्वतःचे कर्तृत्व सिद्ध करते, हा संपूर्ण जीवनपट आज एकविसाव्या शतकातही खूप प्रेरणादायी ठरतो. पुरुषप्रधान चातुर्वर्ण्यव्यवस्था, आध्यात्मिक अवडंबर आणि सामाजिक अनागोंदीच्या काळात कालपटलावर आपली पावले उमटविण्याचा एक संस्मरणीय व अनुकरणीय पराक्रमच अहिल्याबाईंनी केला होता.

अगदीच तरुणपणी अहिल्याबाईंचे पती खंडेराव यांचे निधन झाल्याने धार्मिक प्रथेनुसार त्या सती जाणार होत्या



परंतु सासरे मल्हाररावांनी विवेकीपणाने हे टाळले आणि अहिल्याबाई माळव्याच्या 'राणीसाहेब' झाल्या. सासरा व सुनेचे हे अत्यंत क्रांतिकारी पाऊल होते. अहिल्याबाईंनी लगेच शेतकरी व छोट्या दुकानदारांच्या आर्थिक विकासाची धोरणे राबविण्यास प्रारंभ केला. भिल्ल आणि गोंड या आदिवासी समाजांचे संपूर्ण पुनर्वसन केले. माळव्यातील किल्ले व रस्त्यांची सुधारणा करताना त्यांनी भारतात बऱ्याच ठिकाणी धर्मशाळा, मंदिरे, घाट, विहिरी, तलाव, रस्ते इ. अनेक लोकोपयोगी कामे केली. इंदोर शहराच्या दक्षिणेला त्यांनी महेश्वर या गावी आपली राजधानी वसवली. रोजगार निर्मितीसाठी व औद्योगिक विकासासाठी कापड उद्योग उभा केला. त्या रोज जनतेला भेटायच्या आणि त्यांची गाऱ्हाणी ऐकून लगेच न्याय द्यायच्या. न्याय करताना त्या मानवतेवर आधारित नितीशास्त्राचा आधार घ्यायच्या. चातुर्वर्ण्यव्यवस्थेच्या भंपक प्रथांना व अन्यायी नियमांना त्या कटाक्षाने टाळायच्या. त्यांनी आपल्या मुलीचे लग्न यशवंतराव फणसे या शूर परंतु गरीब असलेल्या युवकाशी करविले होते. त्यांच्या राज्यात हिंदू व मुस्लीम गुण्यागोविंदाने रहायचे.

अहिल्याबाईंनी आपल्या भूमीचे रक्षण शेवटपर्यंत केले. यासाठी प्रत्यक्ष रणात उतरून त्यांनी सेनेचे नेतृत्व केले. सासरे मल्हाररावांनी मराठा साम्राज्याचा विस्तार सर्वदूर करण्याच्या प्रचंड मोठ्या कार्यातील सिंहाचा वाटा उचलला होता. हीच मर्दुमकी अहिल्याबाईंनी पुढे चालू ठेवत महादजी शिंदेंना क्रियाशील पाठिंबा दिला होता. बाह्यआक्रमकांना यशस्वीपणे एका बाजूला थोपवत दुसऱ्या बाजूला आपल्या राज्यातील विकासाचे अनेक प्रकल्प त्यांनी राबविले होते. विशेषतः तळागाळातील लोकांच्या जटील समस्यांची सोडवणूक करताना त्या आपल्या अंतर्मनातील मानवतेचा आवाज ऐकायच्या. त्याकाळी मध्य प्रदेशात इतर बऱ्याच उत्तरी प्रदेशांप्रमाणे रानटी प्रथांचा बोलबाला असताना अहिल्याबाईंनी जो न्याय बहुजनांना व महिलांना दिला तो सामाजिक सुधारणांच्या वाटचालीतील मैलाचा दगड ठरला. याच कारणामुळे त्या सामान्य लोकांच्या हृदयातील देवी आणि संत बनल्या.

अहिल्याबाईंच्या चतुरस्र कार्याचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे समाजाची सांस्कृतिक जडणघडण. यासाठी त्यांनी कला, साहित्य व संगीताला उत्तेजन दिले. ज्या समाजात अशा सांस्कृतिक घडामोडी होत नसतात तो समाज हळूहळू एक सडक्या पाण्याचं डबकं बनतो. अहिल्याबाईंच्या कार्यात आपणांस समाजाला सर्व बाजूंनी 'प्रगल्भ' बनविण्याचे चारही उपक्रम दिसतात जे आहेत, आर्थिक, बौद्धिक, सांस्कृतिक व सामाजिक. नेतृत्वातील इतकी चतुरस्रता आपण अभावानेच पहातो. आज भल्याभल्या प्रगत(?) व सुशिक्षित समाजातील स्त्रिया या पुरुषप्रधान जाती व कुटुंबव्यवस्थेत बदल करण्याबाबत निष्क्रिय असतात. स्त्रियांना गुलामीच्या साखळ्यांनी बांधून ठेवण्यासाठी आजही अंधश्रद्धा व पुरुषी परंपरांचा आधार 'तथाकथित संपन्न' समाजातही घेतला जातो. कल्पना करा, अठराव्या शतकात एका छोट्या धनगर कुटुंबातील मुलगी इतकं मोठं समाज – परिवर्तन घडवून आणण्याचे अनेक प्रकल्प राबविते! विवेकी विचार, धैर्य, चिकाटी, संयम, कल्पकता, मानवतेला समजून घेण्याची प्रज्ञावंत अशी भूमिका, नवनव्या गोष्टी जाणून घेण्याचा ध्यास, रयतेसाठीची तळमळ व सर्वाधिक महत्त्वाची बाब म्हणजे त्याग व न्याय या मूल्यांचे काटेकोरपणे केलेले पालन इ. अनेक तेजस्वी वैशिष्ट्ये असलेलं चौफेर व्यक्तिमत्त्व अहिल्याबाईंनी स्वतःबाबतीतलं घडवलं होतं. त्यांच्या वडील व सासऱ्याप्रमाणे आजच्या तरुणांनी महिलांबद्दलचा सामाजिक दृष्टिकोन बाळगला तर भारतीय समाज वेगाने प्रगल्भ व प्रगत होत जाईल. पुण्यश्लोक अहिल्याबाईंचा हा सुधारणांचा वसा आपण पुढे नेऊयात!

*Copyright © jakhotiya.com / Right to change/reproduce withheld, IPC copyright Act 1957. The article can be forwarded with author's name for public awareness.*

*वरील लेख भारतीय प्रताधिकार कायदा १९५७ नुसार फेरफार अथवा नक्कल निषेधित. लेखकाच्या नावानिशी हा लेख विविध समूहांमध्ये पाठविता येईल.*

# विश्व कीटकांचे

• डॉ. राहुल मराठे (पृ. ३६५), पुणे भ्रमणध्वनी : ८८३०१४४९२६

**या** ग्रहावरील एकूण जैवविविधतेपैकी ७० टक्के कीटक आहेत. किडे सर्वत्र आढळतात. कीटक हा निसर्गाचा महत्त्वपूर्ण भाग आहे आणि ते अन्न साखळीचा अविभाज्य भाग आहेत. या ग्रहाचा सर्वात जुना किडा म्हणजे ड्रॅगन फ्लाय जो सध्याच्या काळापासून जवळपास ३०० दशलक्ष वर्षांपूर्वी दिसत असे. साधारण ३ फूट लांब पंख होते आणि ते खूप मोठे होते. सध्या दिसणारे ड्रॅगन फ्लाय लहान आहेत. सर्वात यशस्वी प्राणी आजपर्यंत शास्त्रज्ञांनी या ग्रहावर सुमारे सव्वा दशलक्ष प्रजातींच्या प्राण्यांचा समावेश केला आहे, किटकांचा यात दोन तृतीयांश भागांचा समावेश आहे. नैसर्गिक आणि कृत्रिम दोन्ही पदार्थांचा विस्तृत आहार, खडतर आयुष्य, संरक्षणात्मक एक्सोस्केलेटन (पंख स्वरूपी आवरण) आणि पुनरुत्पादित करण्याची विलक्षण क्षमता, यामुळे कीटक या भूतलावर खंबीरपणे जगत आहे.

कीटक आणि बगमध्ये फरक आहे काय? हो आहे, त्यात फरक आहे. बग हा एक विशिष्ट प्रकारचा कीटक आहे. मारेकरी बग आणि दुर्गंधीयुक्त बग अशी आपली काही उदाहरणे कदाचित परिचित असतील. खऱ्या बगमध्ये एक स्टाइल (तोंडाचा आकार पाइपसारखा) असतो जो ते वनस्पतींमधून वनस्पतींचे रस शोषण्यासाठी वापरतात. मारेकरी बग इतर कीटकांचे रक्त शोषण्यासाठी त्यांच्या शैली वापरतात. खऱ्या बगचे पुढील पंख अर्धे जड आणि अर्धे मऊसर असतात. मागील पंख सामान्यत: पुढच्या पंखांच्या खाली असतात. या लेखात कीटकांविषयी काही माहिती देत आहे

**सर्वात मोठा कीटक कोणता आहे?**

बर्नार्ड क्लॅस्टनिझर यांनी लिहिलेल्या बीटल्स नावाच्या पुस्तकात दक्षिण अमेरिकेच्या लाँगहॉर्न बीटल (टायटॅनस गिगान्टियस) नावाचे एक बीटल आहे जे २५ सें.मी. सर्वात वजनदार कीटक बहुधा आफ्रिकन गोलियाथ बीटल (मेगासोमा एलेफास) आहे, त्याचे वजन ९६ ग्राम आहे. आणि सर्वात लांब कीटक म्हणजे एक स्टिक कीटक (फॅरनासिया सेरिटाइप्स). याच्या मादी कीटकांची लांबी ३६ सेंमीपेक्षा जास्त असू शकते.

कीटकांचे मूल्य? असे अनेक किडे आहेत ज्यांना पैशात मोजता येणार नाही. उदाहरणार्थ, कीटकांद्वारे विनामूल्यपरागीभवन, अन्यथा, दरवर्षी अब्जावधी रुपये खर्च करावे लागतात. मधाची किंमत काय? मधमाशी आपल्याला विनामूल्य मध देते, प्रार्थना कीटक आणि लेडीबर्ड बीटलसारखे कीटक हानिकारक कीटक खाऊन कीटकनाशकांवरचा खर्च कमी करतात. रेशीम पतंग रेशीम तयार करतात. काही कीटक प्रथिनांसाठी खाल्ले जातात. असे अनेक कीटक आपल्याला काही ना काही विनामूल्य देत असतात. पण काही हानिकारक कीटकांमुळे इतर कीटकांचेही नाव खराब होते. त्यामुळे बरेचदा दिसला किडा की मार त्याला असे सर्वसामान्य चित्र पाहायला मिळते.

**कीटक कसे वाढतात?**

कीटकांचे बाहेरील भाग हे टणक व आत कोमल भाग असतात. यामुळे त्यांचे वाढणे अवघड होते. प्रत्येक वेळी जेव्हा त्यांना मोठे व्हायचे असते तेव्हा त्यांची त्वचा कडक होण्यापूर्वी त्यांना आपली कातडी फाडून त्यांचे आकार बदलून काढावे लागते. याला मोल्टिंग म्हणतात. याचा अर्थ असा की एकदा कीटक त्याच्या अंतिम आकारात (प्रौढ स्वरूपाचा) झाला की तो आणखी मोठा होऊ शकत नाही. म्हणून आजूबाजूला आपण उडणारी फुलपाखरे आणि पतंग बघतो त्यांचा आकार आत मोठा होणार नाही.

**कीटक काय खातात?**

तेथे बरेच भिन्न कीटक आहेत आणि प्रत्येकजण काहीतरी वेगळे खाऊ शकतो. त्यापैकी बरेच झाडे खातात. त्यातील काही इतर कीटक खातात. डास रक्त पितात. काही कीटक वनस्पतींमधून अमृत पितात. झुरळे किंवा मुंग्यांसारखे अनेक कीटक सांडलेले अन्न खातात.

**सर्वात विषारी कीटक कोणता?**

सर्वात विषारी कीटक हेमेनोप्टेरा ऑर्डरमध्ये (मधमाश्या आणि मुंग्या) असतात आणि बहुतेक सर्वात जास्त विष हे हर्वेस्तर मुंग्यांमध्ये असते.

**सर्वात वेगवान कीटक कोणता?**

स्फिंक्स मॉथ किंवा हॉक मॉथ हे साधारण ५३ किमी/ ताशी

वेगाने उड्डाण करू शकतात. तथापि, घोड्यांच्या शरीरावरील माशी (हायबॉमिट्रा हिनेई रीघट्टी) ताशी १४५ कि.मी. वेगाने उडू शकते. यापेक्षा काही वेगवान कीटक असू शकतात. अधिक वेगवान कीटक शोधण्यासाठी संशोधन करण्याची आवश्यकता आहे.

**कीटक शब्द कोठून आला?**

प्लेटोला प्राचीन ग्रीक काळाच्या कीटकांविषयी माहिती होती. बायबलमध्येही किड्यांचा उल्लेख आहे. लिन्नियसने त्याला सापडलेल्या सर्व कीटकांची यादी करण्यास सुरुवात केली. Insect (कीटक) हा शब्द लॅटीन भाषेतील आहे. हे नाव मूळतः काही छोट्या प्राण्यांना देण्यात आले होते, ज्यांचे शरीर कापलेले किंवा जवळजवळ विभक्त केलेले दिसते.

**सर्वात जास्त काळ कोणता कीटक जगतो?**

वाळवीची राणी साधारण ५० वर्षे जगते, टोळ १७ वर्षे, काही बग एका वर्षापेक्षा कमी जगतात आणि हंगामी असतात. तथापि, लाकडाचे काही बीटल लाकडातून ४० वर्षांनी सुद्धा येऊ शकतात. काही कीटक काही तास जगतात तर काही कीटक बरेच वर्षे जगतात. सिकडा नावाच्या कीटकाची अळी साधारण ११ वर्षे अळी अवस्थेत राहते.

**सर्वात लहान कीटक कोणता आहे?**

सर्वात लहान कीटक अंडी परोपजीवी माशा समूहातला, ताचिनिडे कुटुंबातील सदस्याशी संबंधित आहेत. ही अंडी सहसा केवळ ०.०२ ते ०.२ मिमी लांबीची असतात.

**सर्व कीटक चावतात का?**

असे बरेच किडे आहेत जे लोकांना चावत नाहीत. कीटकांमध्ये विविध प्रकारच्या मुखरचना असतात. चाव्याव्दारे/ चावण्याकरिता मुखपत्रे आहेत, शोषण्याकरिता स्ट्रॉसारखे मुखपत्र आणि लोकांना चावायला वस्तरा-धारदार मुखपत्र आहेत. बहुतेक कीटक मात्र लोकांना चावत नाहीत. ते वनस्पती, किंवा अमृत किंवा इतर कीटक खाण्यात समाधानी असतात. डास मात्र आपल्याला आवर्जून चावतात.

**जगात किती कीटक आहेत?**

जगात कीटकांच्या १,०१७,०१८ प्रजाती आहेत हा वैज्ञानिक अंदाज आहे. याचा अर्थ असा की आपण आपले संपूर्ण आयुष्य विविध प्रकारचे कीटक पहात घालवू शकतो.

**कीटकात रक्त आहे का?**

किड्यांमध्ये रक्त असते, परंतु ते आपल्या रक्तासारखे नाही. आपले रक्त लाल आहे कारण त्यात हिमोग्लोबिन आहे, ज्याचा उपयोग ऑक्सिजन शरीरात आवश्यक असलेल्या ठिकाणी नेण्यासाठी केला जातो. कीटकांना हवेच्या नळ्या असलेल्या जटिल प्रणालीतून ऑक्सिजन मिळतो जे स्पराकलस नावाच्या नळ्याबाहेरील भागात जोडले जातात. म्हणून त्यांचे रक्त ऑक्सिजन बाळगण्याऐवजी शरीराच्या एका भागापासून दुसऱ्या भागात पोषक द्रव्ये वाहून नेते. जेव्हा त्यांना दुखापत होते तेव्हा ते रक्तस्राव करतात आणि त्यांचे रक्त गुठळ्या होऊ शकते जेणेकरून ते किरकोळ जखमांवरून बरे होऊ शकतात.

काही वेगळी माहिती – लेडीबर्ड आपल्या आयुष्यात ५००० पेक्षा जास्त कीटक खाऊ शकतात, अंतराळात पाठविलेली पहिली फळमाशी होती, मधमाशी सेकंदामध्ये १९० वेळा पंख हलवते, सुरवंटाला १२ डोळे असतात, एक शेणकिडा आपल्या वजनापेक्षा ११४१ पट वजन वाहू शकतो जी माणसाला खेचणाऱ्या सहा डबल डेकर बसेससारखे आहे, फुलपाखरे त्यांच्या पायांनी चव घेतात, ग्रासहॉपरच्या मागील पायांमध्ये विशेष अवयव असतात जे उडी मारण्यासाठी ऊर्जा साठवतात. ♦

# वाढदिवस

तिस्क उसगांव (ता. फोंडा) येथील. मूळ पाली (ता.डिचोली) येथील (पृ. ५४१) निवृत्त स. प्रा. शिक्षक श्री. गोविंद ना. मराठे यांची नात (अमित गो. मराठे याची मुलगी) कु. आभा हिचा चौथा वाढदिवस समारंभ श्री समर्थ सदन येथे संपन्न झाला. तसेच श्री. गोविंद ना. मराठे यांचा ८०वा वाढदिवस व सौ. गीता गो. मराठे यांचा ७०वा वाढदिवस एकाच वेळी संपन्न झाला. आभा १४ फेब्रुवारी व गोविंद, गीता २८ फेब्रुवारी, दोन्ही वेळी जवळचे नातेवाइकांनी भेटवस्तू दिल्या, संध्याकाळी निरनिराळ्या पंचपक्वानांचा बेत केला होता. १४ रोजी व्हॅलेंटाइन डे चा योग होता.

**श्री. गोविंद ना. मराठे** (पृ.५४१), गोवा

**भ्रमणध्वनी : ९७६५०४२५६६**

* * *

मराठे प्रतिष्ठानद्वारा श्री. गोविंद ना. मराठे,
सौ. गीता गो. मराठे यांचे हार्दिक अभीष्टचिंतन.
कु. आभा हिला अनेकोत्तम शुभाशीर्वाद.

# गोमंतक मराठे परिवार वार्षिक संम्मेलन

• सौ. शुभदा दीपक मराठे (पृ. ५३३), गोवा दूरध्वनी : ०८३२-२३०६३७५

**गो**मंतक मराठे परिवार वार्षिक संमेलन रविवार दिनांक ११ एप्रिल २०२१ रोजी कुळण साखळी येथे श्री देवी योगेश्वरी मंदिराच्या सभागृहात संपन्न झाले.

परिवार अध्यक्षा पूजा विष्णू यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत केले व प्रास्ताविकही.

आजच्या संमेलनाचे प्रमुख अतिथी आणि वक्ते या नात्याने श्री. सोमण यांना निमंत्रित केले होते. त्यांच्या हस्ते समई प्रज्वलित करून संमेलनाला सुरुवात झाली.

वर्षभरातील कामकाजाचा आढावा घेणारा अहवाल सचिव श्री. अजित मराठे यांनी सादर केला. तसेच खजिनदार श्री. महेश वसंत यांनी संपूर्ण वर्षभराच्या जमाखर्चाचा तपशीलवार हिशेब सर्वांसमोर ठेवला. वर्ष पद्धतीप्रमाणे परिवारातील दोन ज्येष्ठ व्यक्ती श्रीमती अन्नपूर्णा वसंत मराठे व श्री. सदाशिव नारायण मराठे यांचा प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

गौरव मूर्तींना शाल, श्रीफळ आणि स्मृतिचिन्ह प्रदान करण्यात आले. गौरवमूर्तींचा परिचय चिरंजीव वेद व श्री. अजित मराठे यांनी करून दिला.

श्रीमती अन्नपूर्णा वसंत या पूर्वाश्रमीच्या बर्वे कुळातील असून त्यांनी आपल्या संसारात गृहिणी पदाचे उत्तमरीत्या पालन करून एक आदर्श गृहिणी बनण्याचा मान मिळविला आहे. त्यांचे शिक्षण एसएससीपर्यंत झालेले आहे. त्या आपल्या मुला, नातवंडासमवेत सुखासमाधानाने राहतात.

श्री. सदाशिव नारायण मराठे हे एका मोठ्या कुटुंबातील सदस्य असून ते वेळगे सत्तरी येथे स्थायिक आहेत. यांचे शिक्षण बेळगाव येथे झाले असून सुरुवातीला सहा महिने त्यांनी नोकरी केली पण त्यांच्या मोठ्या भावाने त्यांना मराठ्यांनी नोकरी न करता व्यवसाय करावा असा सल्ला दिला. त्याने तो मानून नोकरी सोडली व आपल्या व्यवसायात स्थिर झाले. सदूकाका हे एक हरहुन्नरी व्यक्तिमत्त्व असून त्यांनी अतिशय कष्टाने आपली शेती बागायती तयार केलेली आहे. अजूनही ते तितक्याच जोमाने दिवसभराची कामे करत असताना दिसतात.

प्रमुख अतिथी श्री. सोमण यांनी आपल्या भाषणात मराठे कुलबांधवांचे त्यांच्या जिद्दीबद्दल खूप कौतुक केले. परिवारातील नवीन नवीन उपक्रमांची स्तुती केली. आमच्या चांगल्या कार्याला सुयश चिंतून शुभेच्छा दिल्या. आपण स्वतः मराठ्यांचा जावई असल्याचा आपल्याला खूप अभिमान वाटतो असे ते म्हणाले. लॉकडाऊनच्या काळातही आपण या ना त्या कारणाने परिवाराचे कार्य चालूच ठेवल्याचे पाहून खूप समाधान वाटते. इतर कुलबांधवांनीही या सारखेच कार्य केले तर चित्पावन ब्राह्मण संघाला भरीव कार्य करता येईल असे ते पुढे म्हणाले.

टाळेबंदीच्या कालावधीत योगेश्वरी देवस्थानचे उत्पन्न घटल्यामुळे मराठे परिवाराने आपत्कालीन निधी जमा करून चित्पावन ब्राह्मण संघाला भरीव मदत केली. योगेश्वरी मंदिराच्या परिसरात उभारण्यात येणाऱ्या संघ भवनामध्ये मराठे परिवाराचा काही सहभाग असावा म्हणून निधी उभारण्यासाठी आवाहन करण्यात आले. त्याला चांगला प्रतिसाद मिळेल अशी आशा व्यक्त करण्यात आली.

दुपारी योगेश्वरीची आरती करून खेळीमेळीच्या वातावरणात सहभोजनोत्तर संमेलनाची सांगता करण्यात आली.

संमेलनाला मराठे बांधवांची उपस्थिती बऱ्यापैकी होती.

संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रनिवेदन मास्टर अवधूत मराठे यांनी केले तर आभार श्री. संतोष ऊर्फ नारायण काशिनाथ मराठे यांनी मानले. ♦



**'मराठे प्रतिष्ठान'चे भूतपूर्व कार्यवाह व विश्वस्त श्री. मोहन मराठे यांचा कोरोनाकाळातील नवीन छंद.**



# मातृभाषेतून शिक्षण

• श्री. परीमल मराठे (पृ. ३४१), औरंगाबाद भ्रमणध्वनी : ८९७५५६७५७४

**मा**तृभाषेतून शिक्षण द्यावे का? मातृभाषेतून फक्त प्राथमिक शिक्षण द्यावे की उच्च शिक्षण द्यावे? उच्च शिक्षण फक्त इंग्रजी माध्यमातूनच द्यावे का? अभियांत्रिकी व कला शाखा यातील काही विषय एकत्रित किंवा समांतरपणे शिकता येतील का? शिकावेत का? या किंवा यासारख्या अनेक प्रश्नांवर अनेक वर्षे चर्चा सुरू असते व आजही आहे.




नुकतीच नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करण्यात केंद्रीय मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे त्यानंतर शैक्षणिक क्षेत्रात अनेक बदल घडणे अपेक्षित आहे. नवीन धोरणामध्ये व्यावसायिक शिक्षण व प्रशिक्षण यावर भर देण्यात आला आहे. तसेच दोन भिन्न क्षेत्रांतील विषय शिकण्याची मुभा सुद्धा देण्यात आली आहे. जसे की एक विद्यार्थी एकाच वेळी कला व अभियांत्रिकी विषयात पदवी प्राप्त करू शकतो. एक पदवी मुख्य पदवी व दुसरी उपपदवी (minor) स्वरूपात मिळू शकते.

नवीन शैक्षणिक धोरण याप्रमाणे मातृभाषेस प्राधान्य देण्यात आले आहे त्याचाच एक भाग म्हणून अखिल भारतीय तंत्रशिक्षण मंडळाने सात राज्यभाषांमधून उच्च शिक्षण, तंत्रशिक्षण देण्यास मान्यता दिली आहे. मातृभाषेतून शिक्षण देण्यासाठी मातृभाषेतून पाठ्यक्रम पुस्तके लिहिण्यास प्रोत्साहन देण्यासाठी अशा पाठ्यक्रम पुस्तक लेखकांना अनुदान देण्याची तयारी केली आहे. मराठीमधून अभियांत्रिकी शिक्षण देण्यासाठी दोन महाविद्यालये तयार असल्याचे आजच्या वर्तमानपत्रात छापून आले आहे. मुळात कोणताही विषय समजण्यासाठी मातृभाषेतील शिक्षण जास्त उपयुक्त ठरू शकते. याचा अर्थ इंग्रजी माध्यमातून शिकवू नये अथवा इंग्रजी शिकू नये असा नाही तरीसुद्धा मातृभाषेतून मिळणारी माहिती व शिक्षण त्या विषयाची क्लिष्टता नक्कीच कमी करू शकते.

सरकारी किंवा देशपातळीवर धोरण ठरणे तसेच त्याची अंमलबजावणी हा खूप मोठा व प्रक्रियाआधारित विषय आहे. २०१८ मध्ये मी श्री. वसंत आचवल सरांना काही कामानिमित्त भेटायला गेलो असताना आचवल सरांनी मला काही टिपणे त्यांना मराठीत टाइप करून हवी असल्याचे सांगितले. वयाच्या ऐंशीव्या वर्षीही सर स्थापत्य अभियांत्रिकीमधील strength of material अर्थात पदार्थ बल हा विषय अनेक वर्षांपासून शिकवतात व त्या संदर्भातील टिपणे चक्क मराठी भाषेतून होती. हे बघताच मी सरांना सुचवले की नुसतीच ही टिपणे टाइप करून वाटण्यापेक्षा आपण ह्याचे मराठीत (मूळ काही शब्द इंग्रजीतच ठेवून संकल्पना मराठीत समजवावी) पुस्तक छापू या. सरांचा होकार मिळताच आम्ही (progressive expert) कामास लागलो व २०१८च्या ऑगस्ट महिन्यामध्ये 'पदार्थ बल' अर्थात 'strength of material' या मूलभूत अभियांत्रिकी विषयावरील पहिले मराठीतील पुस्तक तयार झाले.

हे पुस्तक प्रसिद्ध जलतज्ज्ञ श्री. माधवराव चितळे यांच्या हस्ते प्रकाशित झाले. अभियांत्रिकी क्षेत्रासाठीचे क्रांतिकारी पाऊल व मातृभाषेतील शिक्षणाचे महत्त्व आपणास कळले या त्यांच्या प्रतिक्रिया आमच्या उपक्रमास पाठिंबा व शुभेच्छा देणाऱ्या होत्या.

मातृभाषेतून शिकवलेला विषय जास्त चांगला कळतो हे आचवल सरांनी अत्यंत अवघड वाटणारा विषय स्ट्रेंथ ऑफ मटेरियल या विषयातील निकाल ९० टक्के जास्त विद्यार्थ्यांना उत्तीर्ण करून सिद्धही करून दाखवले. आगामी काळात अशीच अनेक विषयांवरील विशेषतः तंत्रज्ञानासंबंधित पुस्तके मराठी भाषेतून उपलब्ध करून देण्याचा आमचा (progressive expert) मानस आहे. ♦

# सहवेदना

श्री. सदाशिव गोपाळ जोशी मु.पो. ठाणे यांचे दि. ५ एप्रिल २१ रोजी अल्प आजाराने दुःखद निधन झाले. त्यांचा जन्म २६ सप्टेंबर १९३६ रोजी पेण येथे झाला. वडील भिक्षुकी करत होते. आई पण लहान असताना गेली. त्यांचा सांभाळ काकूने केला. पेण येथे शालेय शिक्षण पूर्ण झाल्यावर नोकरी निमित्ताने सुरुवातीला गिरगाव येथे नंतर ठाणे येथे स्थायिक झाले. ते उत्कृष्ट स्टेनोग्राफर होते. १९६९ साली सौ. सुनंदा यांच्याबरोबर विवाह झाला. सर्वात मोठे असल्यामुळे कौटुंबिक जबाबदारी आणि नोकरी सांभाळून १९७८ पासून ते प. पू. नानासाहेब करंदीकर संस्थापित श्री स्वामी समर्थ परिवारमध्ये सेवा शेवटपर्यंत करत होते. सेवानिवृत्तीनंतर पूर्ण वेळ स्वामी समर्थ परिवारला वाहून घेतले होते.

तसेच सामाजिक कामांत विशेष रस म्हणून १९९० साली 'मराठे प्रतिष्ठान'तर्फे कुलवृत्तांताचे काम चालू होतं त्या वेळी माहिती संकलनाचे काम आपल्या कुलबांधवांचे घरी जाऊन त्यांनी केले. त्या वेळी मोबाइल नाहीत, वाहतुकीची साधन कमी असून सुद्धा भरपूर माहिती जमा करण्यात यशस्वी.

'मराठे प्रतिष्ठान'च्या सांगली येथील कुलसंमेलनाला उपस्थिती तसेच बडोदा येथे पण कुलसंमेलनाला येण्यासाठी उत्साह होता पण काही वैद्यकीय कारणांमुळे अनुपस्थिती.

ते 'प्रतिष्ठान'चे सुरुवातीपासून कार्यरत असलेल्यापैकी एक होते. २६ जानेवारी २०२१ पुणे येथे झालेल्या 'मराठे प्रतिष्ठान'च्या वार्षिक सर्वसाधारण सभा आणि पुणे शाखा वर्धापनदिनाच्या कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित होते.

या सर्व सामाजिक कामांत त्यांना सौ. सुनंदा वहिनींची बहुमूल्य साथ होती.

प्रेमळ स्वभावामुळे सर्व नातेवाईक आणि आप्तेष्टांमध्ये लोकप्रिय होते. त्यांना एक मुलगा आणि एक मुलगी आणि सून, जावई, नातवंड परिवार आहे पुणे स्थायिक.

एकदा पंढरपूर वारी केली होती, ब्रह्म विद्येचा अभ्यासक्रम पूर्ण केला. आपलं आरोग्य चांगले राहो म्हणून हास्य क्लबला जात असत.



त्यांचा पुतण्या श्री. रवींद्र जोशी ठाणे येथे जज्ज आहेत.

५२ वर्षांचा अखंड सहवासाचा शेवटही एकापाठोपाठ झाला. सौ. सुनंदा वहिनी यांचे पण अल्प आजाराने ७ एप्रिल २०२१ ला दुःखद निधन झाले. ईश्वर चरणी प्रार्थना दोघांच्या आत्म्याला शांती लाभो हीच सदिच्छा.

अशी सामाजिक कामांत कार्यरत, मनमिळाऊ, असणारी व्यक्ती आपल्या नात्यात असणं हे सौ. अंजली विजय आणि सौ. मंजिरी मोहन पुणे यांचे भाग्यच आहे. ♦

**प्रेम की गरज**

पतिला पत्नीची गरज आहे
पत्नीला पतिची गरज आहे
म्हणून त्यांचे एकमेकांवर प्रेम आहे ।।१।।
त्यांच्या मुलाना आईबापाची गरज आहे
म्हणून त्यांचे त्यांच्यावर प्रेम आहे ।।२।।
आजोबाना सर्वांचीच गरज आहे
पण त्यांची कुणालाच गरज नाही
म्हणून त्यांच्यावर कुणाचे प्रेम नाही ।।३।।
कर्तव्य पुर्ण करताना सारे पण...
स्नेह मात्र अजिबात नाबी ।।४।।
कुटुंबात प्रेम अपेक्षा राहो वाढो
आजोबानाही त्यात वाटा मिळो ।।५।।
ही ईश्वरचरणी विनवणी

**कवि : मोरेश्वर मराठे,** *सांगली*
मोबा. ९४२२४२०६६९

# नको ताई रूसू...

• श्री. गुरूनाथ मराठे (पृ. ४०८), बोरिवली

कवी मधुकर नीलकंठ जोशी यांचा जन्म १५ सप्टेंबर, १९३० साली नाशिक येथे झाला. नाशिकच्या पेठे हायस्कूलमध्ये त्यांचं शिक्षण झालं. सहावीत असताना त्यांनी 'गांधीस वंदना' ही पहिली कविता लिहिली. त्यानंतर अनेक माध्यमातून काव्यलेखन केलं. प्रसिद्ध गायक दत्तात्रय विष्णू पलुस्कर यांच्याशी त्यांची मैत्री झाली. त्यांच्या शिफारसीवरून त्यांनी लिहिलेली 'प्राचीच्या मंदिरी उषा ये अरुण स्वागताला' ही भूपाळी पंडित सुरेश हळदणकर यांच्या आवाजात आकाशवाणीवर ध्वनीमुद्रित झाली. केंद्र सरकारच्या केंद्रीय अबकारी विभागात त्यांनी १९८८ पर्यंत नोकरी केली. जोशी यांच्या अनेक कवितांना मराठी चित्रपटात स्थान मिळालं आहे. त्यांच्या लेखणीतून उतरणाऱ्या सहज सुंदर कवितांची दखल घेऊन त्यावेळेसच्या पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप मारली. त्यानंतर तत्कालीन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण, विलासराव देशमुख यांनीही त्यांचा सत्कार केला होता. विविध पुरस्कारांनी त्यांचा गौरव करण्यात आला. त्यांनी अनेक गाणी लिहिली. 'अशीच आमुची आई असती', 'आकाश पांघरूनी जग शांत झोपलेले', 'नको ताई रुसू कोपऱ्यात बसू', 'पाषाणातून वेड्या का तू...', 'जात्यामधले दाणे रडती' अशी असंख्य गाणी गाजली. मला त्यांचं मनापासून आवडलेलं गीत म्हणजे 'नको ताई रुसू कोपऱ्यात बसू'. या गाण्याला श्रीनिवास खळे यांनी सुमधुर चाल दिली आहे. तसंच आशा ताईंनी या गाण्याचं अक्षरशः सोनं केलं आहे. आजही ते गाणं रसिकांच्या ओठावर कायम आहे. त्या गाण्याच्या ओळी खालीलप्रमाणे...

नको ताई रुसू, कोपऱ्यात बसू  
येऊ दे गं गालात खुदकन हसू

इवल्याश्या नाकावर मोठ मोठा राग  
देऊ काय तुला हवे ते माग  
नवरा हवा का, लठ्ठ हवी सासू

बाहुलीच्या लग्नाचा खेळ गडे खेळू  
लग्नात बुंदीचे लाडू आता वळू  
नवीन कपड्यांत छान छान दिसू

चांदीचे ताट तुला चंदनाचा पाट  
केसरी भात केला, आहे मोठा थाट  
ओठांत आले बाई लडिवाळ हसू

♦

## ।। श्री स्वामी समर्थ ।।



द्यावे मज सुखसाधन । अज्ञान तिमीर निरसोन।।  
ज्ञानार्क हृदयी प्रकटो पै ।।  
शांती मनी सदा वसो, वृथाभिमान नसो।  
सदा समाधान वसो, तुझ्या कृपेने अंतरी ।।  
भव दुःख हे निरसो, तुझ्या भजनी चित्त वसो।।  
वृथा विषयांची नसो, वासना या मनाते ।।  
सदा साधु समागम । तुझे भजन उत्तम ।।  
तेणे होवो हा सुगम । दुर्गम जो भवपंथ ।।  
व्यवहारी वर्तता । न पडो भ्रांती चित्ता ।।  
अंगी न यावी असत्यता। सत्ये विजयी सर्वदा ।।  
आप्तवर्गाचे पोषण । न्याय्य मार्गावलंबना ।।  
इतुके द्यावे वरदान । कृपा करूनी समर्था ।।

**– अच्युत म. चक्रदेव** (पृ.७५३), पुणे  
मोबा.: ९६२३५५०६३३

## पूज्य स्वामी विवेकानंद यांचे मौलिक विचार

''तुम्हाला हवे असलेले सर्व सहाय्य व सर्व बळ तुमच्यामध्येच आहे. म्हणून आपले उज्ज्वल भवितव्य तुम्ही स्वतःच आपल्या हाताने घडवा. भूतकाळी काय घडले याची चिंता करू नका. त्याकडे लक्ष देवू नका. अनंत भविष्यकाळ तुमच्यासमोर पसरलेला आहे. नीट ध्यानात ठेवा तुमचा प्रत्येक शब्द व तुमचा प्रत्येक विचार व तुमचे प्रत्येक कर्म ही तुमचे संचित निर्माण करीत आहे.

तुमचे वाईट विचार व तुमची वाईट कृत्ये ही जशी एखाद्या वाघाप्रमाणे तुमच्यावर झडप घालण्यास टपलेली आहेत. तसेच तुमचे चांगले विचार व तुमची चांगली कामे देखील लाखो देवदूतांच्या सामर्थ्यानिशी तुमचे रक्षण करण्यास सदैव तत्पर आहेत.'' या स्फूर्तिदायक आशेचे कधीही विस्मरण होवू देवू नका.''

**– अच्युत म. चक्रदेव** (पृ.७५३), पुणे  
मोबा.: ९६२३५५०६३३

# आनंदी बरणी

ठरविले आम्ही मैत्रिणींनी, एका भिशी प्रसंगी, एक आनंदी अनुभव भरायचा बरणीत प्रत्येक दिनाला,
शशिकलाने लिहिलं कागदावर, आईच्या सहस्त्रचंद्र दर्शन सोहळ्याला, जेऊ घातले निवारा वृद्धाश्रमाला ।।१।।

शाळेत पोचविताना गीताने घेतले होते स्कूटरवर नातवाला, आश्चर्य म्हणजे ट्रॅफिक जाम न होता,
तिला जाता आले एकदम वेळेवर शाळेला ।।२।।

किशोरीने कोकणातील मूळगावी शाळा बांधायचा बराचसा खर्च उचलला,
अन् कॅलिफोर्निया स्थित दत्तक मुलीच्या लग्नाचा अवास्तव खर्च टाळला ।।३।।

नीलिमाच्या वृद्ध सासऱ्यांना ICU मध्ये होते ॲडमिट केले, दोनच दिवसांनी घरी आणल्यावर,
चिमुरड्यांनी आबांना प्रेमाने घास भरविले ।।४।।


कुबेर बिल गेट्सने व्रतस्थ प्रकाश आमटेंचा हार्दिक सत्कार केला जेव्हा,
आम्ही सर्वांनी असाच आनंदी प्रवास करून ही बरणी नेहमीच भरायची ठरविली तेव्हा ।।५।।

अशारीतीने आम्ही समाधानाची तार छेडून, बागेतील बहरलेला सुगंधी गजरा माळला,
मग कडूनिंबाच्या झाडाआडून डोकाविणारा चंद्रमा, सर्वत्र पाहून खुदकन् हसला ।।६।।

**कवयित्री: श्यामला पुरंदरे** (पृ.७५५)
२७ बी वृंदावन सोसायटी,
पंचवटी ज्येष्ठ नागरिक संघ, पंचवटी, पाषाण.
फोन – (०२०)२५८९८५३४

---

# साभार पोच




**यशोगीत सैनिकांचे १८५७ ते १९४७**

| | | |
|---|---|---|
| **लेखिका** | : | स्वामिनी विक्रम सावरकर (भ्रमणध्वनी ९३०७९६३१६१) |
| **संशोधन साहाय्य** | : | अरुण यशवंत बक्षी, अनुराधा खोत |
| **प्रथमावृत्ती** | : | ७ मार्च २०२१ |
| **प्रकाशक** | : | कृष्णा प्रकाशन, ठाणे द्वारा–विद्याधर ठाणेकर |
| **भ्रमणध्वनी** | : | ९८२१५६१३४४ |
| **मुल्य रुपये** | : | **१३०/–** |
| **पृष्ठसंख्या** | : | ९६ |

**पत्रव्यवहाराचा पत्ता** : संपादिका : डॉ. सौ. सुमेधा मराठे, ८/१३, सहकार नगर, वडाळा, मुंबई – ४०० ०३१
भ्रमणध्वनी : ९८२०२३२०८२ • इ–मेल : **hitguj@marathepratishthan.org** • वेबसाईट : **www.marathepratishthan.org**